कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२१

किंमत ४ ₹

दसऱ्याची मुहुर्तमेढ आणि सिमोल्लंघनाची पर्वणी साधून...

उफासा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स् प्रथमच रायगडकरांसाठी घेऊन येत आहे.

डेक्कन स्क्वेअर हे आमचे महत्वाकांक्षी व्यापारी संकुल ज्याचे हस्तांतरण लवकरच होत आहे...
आपल्या व्यवसायाचा श्रीगणेशा करायला ही आहे ही योग्य वेळ !!

रायगड मध्ये प्रथमच

* जर्मन एस्कलेटर्सचा समावेश त्याच प्रमाणे अत्याधुनीक सोयींनी युक्त असा प्रशस्त व भव्य शॉपींग मॉल
* पेण मधील प्रथमच सर्वाधिक विक्री असणारे व्यापारी संकुल
* उच्च प्रतीचे हॉटेल्स, भव्य इलेक्ट्रॉनीक व डिपार्टमेंटलस्टोअर्स, प्रशस्त व सोयी सुविधांनी युक्त वेलनेस सेंटर अशा प्रमुख व्यावसायिकांसाठी उत्तम पर्याय
* पेण बसस्टँड पासून १ मिनिटांच्या अंतरावर व रेल्वे स्टेशन पासून ३ मिनिटांच्या अंतरावर
* आता आपल्या व्यवसायाला दया नवी दिशा व प्रगतीची जोड... उफासा बिल्डर्स सोबत....

कमीत कमी २५ लाखापासून दुकान विक्री सुरु

दसऱ्याच्या शुभ मुहुर्त साधून रायगडकरांसाठी खास ऑफर्स... दि. १ ऑक्टो ते १५ ऑक्टोंबर पर्यंत मर्यादीत..

अग्रगण्य नामांकित बँकाकडून अर्थसहाय्य उपलब्ध

साईट ऑफीस - डेक्कन स्क्वेअर, रायगड बाजार शॉप नं. ७/८
धरमतर रोड, पेण-रायगड

संपर्क- ०९१२६४६९९९९

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ ऑक्टोबर

१) श्री. प्रकाश नारायण म्हात्रे, चेंढरे, अलिबाग.
१३-१०-१९४९.
२) श्री. अशोक प्रतापराव टाक, कामत आळी, अलिबाग.
१३-१०-१९५०.
३) श्री. अशोक गणपत पाटील, वेश्वी, अलिबाग.
१३-१०-१९४६.
४) श्री. जयंत गणपत वीरकुड, अलिबाग.
१३-१०-१९४७.
५) श्री. सुनील मुकुंद कर्वे, अलिबाग.
१३-१०-१९५६.

म ह त्त्वा चे

शकुंतला दाजी राणे यांचे निधन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि पक्षाचे रायगड जिल्हा खजिनदार श्रीराम राणे यांच्या मातोश्री शकुंतला दाजी राणे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पोही येथे मोठे कुटुंब असून त्यांचे पुत्र श्रीराम राणे हे शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा खजिनदार आणि कर्जत तालुका प्रभारी चिटणीस पदावर काम करीत असून एक नातू तेथील वारे ग्रामपंचायतीवर थेट सरपंच म्हणून निवडून आला आहे.

त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार दिनांक १४ ऑक्टोबर सकाळी १० वाजता. श्रीक्षेत्र पोहीनदी पुलाजवळ होणार आहे व त्यांचे उत्तरकार्य रविवार दिनांक १७ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी होणार आहे.

खदानविरोधात रोकाप आक्रमक

खदानींची मंजुरी प्रक्रिया रद्द करा; शिष्टमंडळाची राज्यपालांकडे मागणी

। गडचिरोली । वार्ताहर ।

दोन हजार लोकांच्या रोजगारासाठी वीस हजार कुटुंबांच्या पारंपरिक रोजगाराला खदान खोदून नष्ट न करता पैसा, वनहक्क, खाण व खनिज यासह विविध कायद्यांची झालेली पायमल्ली लक्षात घेऊन स्थानिक आदिवासी जनता आणि ग्रामसभांच्या खदानविरोधी भूमिकेची दखल घ्यावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या शिष्टमंडळाने महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली.

सुरजागड इलाख्यातील ग्रामसभांच्या जंगलांमधून बांबू, तेंदू व इतर गौण वनउपजांच्या व्यवस्थापनातून तेथील ग्रामसभांना मोठ्या प्रमाणावर शाश्वत रोजगार निर्माण झालेला आहे. तसेच तेथील देवांच्या पवित्र जंगलांतून उपजीविका व उदरनिर्वाह पारंपरिक रित्या ग्रामसभा करीत आहेत. त्यामुळे शासनाने स्थानिकांना रोजगारनिर्मितीच्या नावावर तेथील जंगल व पहाडांमध्ये खदानी खोदून, तेथील पारंपरिक साधनसंपत्ती व जैविकविविधता नष्ट करु नये.

सुरजागड परिसरातील सुरजागड येथे आमच्या माडीया गोंड आदिम जमातींचे व इतर आदिवासी जमातीचे प्रमुख श्रद्धास्थान असलेले ठाकूरदेव व दमकोंडवाही येथे तळ्होरमुत्ते,माराई सेडो व बंडापेनाचे पवित्र डोंगर-पहाड व जंगल आहे. सोबतच इतर धार्मिक पुजास्थाने असतांना, शासन व कंपन्यांकडून कोणतीही खातरजमा न करता सदर ठिकाणी लोह उत्खननाची व पुर्वेक्षणाची मंजूरी दिली गेल्याने तेथील देव व देवांचे पवित्र डोंगर-पहाड व जंगल शासनाने खदानीकरीता विकले. भारतीय संविधानाच्या कोणत्याही कलमात आदिवासींचे देव व देवांच्या पवित्र जागा विकणे किंवा त्या ठिकाणी खदानी खोदण्याची तरतुद नसतांनाही शासनाच्या विविध विभागांनी मे.लॉयड्स मेटल्स् अँड इंजिनिअर्स लिमी. मुंबई याचेसह वर उल्लेखित कंपन्यांना आमच्या देव व देवांच्या जागा असलेले पवित्र डोंगर-पहाड व जंगल खदानी करीता विकलेले आहेत. सदरची बाब संविधान विरोधी, कायदे विरोधी तसेच धार्मिक व सांस्कृतिक प्रथा, परंपरा विरोधी असल्याने शासनाच्या संबंधीत विभागांनी एटृटापल्ली तालुक्यातील मंजूर असलेल्या व प्रस्तावित असलेल्या संपूर्ण खदानींची मंजूरी व मंजूरीची प्रक्रीया तात्काळ रद्द करण्यात यावी.

कोरची तालुक्यातील आगरी, मसेली व झेंडेपार येथे प्रस्तावित करण्यात आलेल्या लोह खदाणी स्थानिक जनतेच्या प्रखर विरोधानंतरही जबरीने खोदण्याकरीता गडचिरोली येथे फर्जी जनसुनावणी घेवून मंजूरीची प्रक्रीया वरिष्ठ स्तरावरुन देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

हा स्थानिकांना त्याच्या घटनात्मक हक्क आणि अधिकारापासून वंचित करण्याचा प्रयत्न आहे. तसेच या खदानींमुळे आदिवासी समाजाचे पारंपरिक देवस्थाने, नैसर्गिक पुजास्थाने आणि रावपाट गंगाराम घाट यात्रा उत्सव ठिकाणे धोक्यात येणार आहेत. तसेच पेसा वनाधिकार कायद्यान्वये प्राप्त गौण वन उपज, जगण्याची पारंपरिक संसाधने नष्ट होण्याची शक्यता आहे. करीता सदरची संपूर्ण मंजूरी प्रक्रीया तात्काळ रद्द करावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केली आहे.

दरम्यान महामहीम राज्यपाल हे आमचे पालक असल्याने त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करुन आपली खदानविरोधी भुमिका मांडू यासाठी जिल्ह्यातील हजारो आदिवासी गडचिरोली येथे यायला निघाले होते.

मात्र प्रशासनाकडून सुरक्षेच्या कारणास्तव त्यांना जिल्हाभरात थांबविण्यात आले. घटनात्मक पालक या नात्याने आपणच पारंपरिक रोजगाराची संसाधने आणि संस्कृती रितीरिवाज प्रथा परंपरा यांचे रक्षण करु शकता, अशी आदिवासी जनतेची भावना आहे.

त्यामुळे खदानविरोधी भुमिकेची आपण दखल घ्यावी, अशीही मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई रामदास जराते, भाई शामसुंदर उराडे, भाई रोहिदास कुमरे यांनी केली.

भारतातील मुलांसाठी कोवॅक्सीन लसची शिफारस

हॅशटॅग कोवॅक्सीन झाले ट्रेंड

वर्षा मेहता
। अलिबाग ।

दोन ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना वापरण्यासाठी भारत बायोटेकची कोविड -१९ लस - कोवॅक्सिनची मंगळवारी एका तज्ज्ञ समितीने शिफारस केली. कोवॅक्सिन ही भारतातील मुलांसाठी वापरलेली दुसरी लस असेल. ऑगस्टमध्ये झिडस कॅडिलाच्या तीन-डोस डीएनए जॅब प्रौढ आणि १२ वर्षांवरील मुलांवर वापरण्याची परवानगी होती. त्यामुळे हॅशटॅग कोवॅक्सीन ट्रेंड झाले.

मुलांसाठी तिसरी संभाव्य लस सीरम इन्स्टिट्यूटची नोव्हावॅक्स आहे, ज्यासाठी DCGI ने गेल्या महिन्यात सात ते अकरा वर्षांच्या मुलांसाठी चाचण्या मंजूर केल्या. चौथा म्हणजे बायोलॉजिकल ई कॉर्बेव्हॅक्स, जो पाच वर्षांवरील मुलांवर प्रगत चाचण्या घेण्यास मंजूर झाला आहे. मुलांवर चाचणी केलेली कोवॅक्सिन लस प्रौढांवर वापरल्याप्रमाणेच आहे, परंतु तरुण प्राप्तकर्त्यांना सुरक्षा आणि प्रभावीपणाची हमी देण्यासाठी स्वतंत्र चाचण्या आवश्यक होत्या.

या व्यतिरिक्त हॅशटॅग किंग कोहली ट्रेंड. सोमवारी आयपीएल २०२१ एलिमिनेटरमध्ये कोलकाता नाईट रायडर्सचा (केकेआर) सामना करताना आरसीबीला चार विकेट्सनी पराभव पत्करावा लागला. यूएई आणि ओमानमध्ये १७ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या टी -२० विश्वचषकानंतर विराट कोहली टीम इंडियाच्या टी २० कर्णधारपदावरूनही पायउतार होण्याच्या तयारीत आहे.

SOCIAL MEDIA पडसाद

हातखर्चासाठी पैसे मागणाऱ्या वडिलांना मारहाण

। पनवेल । वार्ताहर ।

होमगार्डमध्ये कामाला असलेल्या एका तरुणाने हातखर्चासाठी पैसे मागणाऱ्या आपल्या वडिलांच्या पोटात लाथा मारुन त्यांना गंभीर दुखापत केल्याचा प्रकार कोपरखैरणेत उघडकीस आला आहे. मयुर सुनील बोडके (२७) असे वडिलांना मारहाण करणाऱ्या मुलाचे नाव असून कोपरखैरणे पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेत जखमी झालेल्या वडीलांचे नाव सुनिल बोडके (५०) असे असून ते कोपरखैरणे सेक्टर-१८ मध्ये रहाण्यास आहेत. त्यांचा मुलगा मयुर बोडके (२७) हा त्याच्या पत्नीसह रहाण्यास असून तो होमगार्डमध्ये कामाला आहे. सुनील बोडके हे काही वर्षापूर्वी माथाडी कामगार म्हणून निवृत्त झाल्यानंतर सध्या ते घरीच आहेत. सुनील बोडके यांचे तीन रुम भाड्याने देण्यात आले असून त्याचे घरभाडे मयुर बोडके घेतो. मात्र त्यातील काहीच रक्कम तो वडिलांना हात खर्चासाठी देत नव्हता. त्यामुळे बोडके यांचे आपल्या मुलगा मयुर बोडके याच्यासोबत नेहमी वाद होत होते. मयुर बोडके याला दारु पिण्याचे व्यसन असून दारु पिऊन आल्यानंतर तो नेहमी आपल्या वडीलांसोबत वाद घालून त्यांच्यासोबत भांडण काढत होता. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी सुनील बोडके हे आपल्या घरात जेवण करत बसले असताना, मयुर बोडके याने वडीलांना शिवीगाळ करुन त्यांना पैसे कशाला पाहिजेत अशी विचारणा करुन त्यांच्या पोटात उजव्या बाजुला जोर-जोरात लाथा मारल्या. त्यानंतर त्यांना लाथ मारुन घराच्या बाहेर ढकलून दिले.

आयुक्तांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

। पनवेल । वार्ताहर ।

पनेवल महानगरपालिकेतील सर्व नागरिकांचे कोरोना लसीकरण शंभर टक्के पूर्ण होण्यासाठी पालिका प्रयत्न करत आहे. याच उद्देशाने आयुक्त गणेश देशमुख यांनी याकुब बेग माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, मायनॉरिटी गर्ल्स स्कूल, हुदा इंग्लिश मिडियम स्कूल, बानस् हायस्कूल या शाळेतील ३०० विद्यार्थ्यांशी ऑनलाईन संवाद साधला.

यावेळी उपायुक्त सचिन पवार, वैद्यकीय आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय अधिकारी रेहाना मुजावर यांनीही या संवादामध्ये सहभाग घेऊन लसीकरणाचे महत्व मुलांना पटवून सांगितले.

पालिका क्षेत्रात जवळजवळ ऐंशी टक्के नागरिकांचा पहिल्या डोसचे लसीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरीत २० टक्के नागरिकांचे पूर्ण करण्यासाठी मुलांनी आपल्या पालकांना लस घेण्यासाठी प्रवृत्त करावे यासाठी आयुक्तांनी आज याकुब बेग माध्यमिक व उच्च माध्यमिक, मायनॉरिटी गर्ल्स स्कूल, हुदा इंग्लिश मिडियम स्कूल, बानस् हायस्कूल शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाला मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला. मुलांनी आपल्या मनातील तसेच आपल्या पालकांचे अनेक प्रश्न आयुक्तांना विचारले. आयुक्तांनी दिलेल्या उत्तरांनी मुलांचे समाधान झाल्याचे दिसून आले.

कोव्हिडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेला थोपवायचे असेल जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण पूर्ण होण्यासाठी पालिका प्रयत्न करत आहे. सोसायट्यांमध्ये पहिला डोस न घेतलेल्या नागरिकांना त्यांच्या सोसायटीमध्ये ७० मोबाईल टिमच्या माध्यमातून लसीकरण केले जात आहे.

सोसायटी पदाधिकाऱ्यांनी आपल्या सोसायटीमध्ये एक ,दोन, तीन असे कितीही नागरिकांचे लसीकरण राहिले असले तरी पालिकेला कळवावे पालिकेची लसीकरण टिम त्याठिकाणी येऊन लसीकरण करेल असे आवाहन पालिकेने केले आहे.

मिशन कवच कुंडल कार्यक्रम यशस्वी

। पनवेल । वार्ताहर ।

महाराष्ट्र शासनातर्फे लसीकरणाची विशेष मोहीम सुरू केली असून, नवरात्री निमित्ताने महिलांना कोव्हिड लस देण्यासाठी कवच-कुंडल अभियान राबविले आहे. मिशन कवच-कुंडल महिला लसीकरण कार्यक्रमास पनवेल तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

कोव्हिड महामारीच्या तिसऱ्या लाटेचा धोका पाहता ही लाट येण्याआधीच मोठ्या प्रमाणात लसीकरण झाले पाहिजे. या दृष्टीकोनातून शासनातर्फे विशेष लसीकरण मोहीम राबविली आहे. या मोहिमेत समाजातील महिलांसाठी नवरात्री निमित्ताने विशेष कवच-कुंडल नावाने विशेष अभियान सुरू केले. मिशन कवच कुंडल अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र उलवे, प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे पनवेल मार्फत चिन्द्रन गामपंचायत येथे रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी व पंचायत समिती सदस्या वैशाली देशेकर, सरपंच कमला देशेकर, डॉ. राज चव्हाण वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

नारपोली प्रा.आ.कें.आजीवली तालुका पनवेल येथे मिशन कवचकुंडल अंतर्गत विशेष महिला कोव्हिड लसीकरण सत्राला जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी भेट दिली. प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे, जांभिवली व नानोशी येथे महिला लसीकरणास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उपकेंद्र दापोली, माणघर, मोसारे, नानोशी, पाटणोली, गराडा बेलवाडी येथे विशेष कोव्हिड लसीकरण मोहीम महिलांसाठी राबविल्यामुळे जास्तीत जास्त महिलांचे प्राधान्याने लसीकरण करण्यात आले आहे. यावेळी सरपंच, उपसरपंच सदस्य यांच्या समवेत आरोग्यसेवक पाटील, आरोग्य सेविका श्रीम वायरे, ग्रामसेविका, आशा स्वयंसेविका मदतनीस, यांच्या उपस्थितीत हे अभियान सुरू आहे.

अब्दुल गफूर अब्दुला मुजावर बेपत्ता

। पोयनाड । प्रतिनिधी ।

सदर व्यक्ती दि.२२ सप्टेंबर २०२१ रोजी घरात प्रातविधीकरिता जाऊन येतो असे सांगून गेले असता आज रोजी पर्यंत घरी आले नाहीत तरी घरी आल्यास पोयनाड पोलीस स्टेशनला संपर्क साधावा ही विनंती. पोयनाड पोलीस स्टेशन- ०२१४१-२५२०४४. पोना /२३१९ म्हात्रे- ८३२९७०२०७४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. सुनिल भाऊ म्हात्रे यांच्या मालकीची मौजे अलिबाग व अलिबाग नगरपरिषद मालमता क्रं. जुना १४१५ व नवीन Z1STS००१६८१ सदर मिळकत ही सदनिका असून ती दिनांक ०७/०१/१९९५ रोजी निशा एन्टरप्रायझेस तर्फे पार्टनर शेखर गंगाधर ब्रम्हे यांच्याकडून विकत घेतेवेळी त्या मिळकतीचे खालील परिशिष्टात नमुद केलेले मुळ खरेदीखत त्यांच्याकडून घेण्याचे राहून गेले अथवा ते माझ्याकडून हरविले आहे. मी वर नमुद मिळकत विकत घेतेवेळी सदर खरेदीखत गहाण ठेवून त्या मिळकतीवर बिल्डर अथवा शेखर गंगाधर ब्रम्हे यांनी कोणत्याही बँकेकडून/ पतसंस्थेकडून/ वित्तीय संस्थेकडून कर्ज काढलेले नाही. याची खात्री केली होती.

मात्र तरी देखील वर नमुद केलेल्या मिळकतीवर खालील परिशिष्टात नमुद केलेल्या खरेदीखताच्या मुळ दस्ताच्या आधारे कोणाचाही विक्री गहाण दान बोजा बक्षिस लिज लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरचा मुळ दस्त त्यांच्या दाब्यात असल्यास त्यांनी त्याची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात कळवावी.

परिशिष्ट

दिनांक ०७/०१/१९९५ रोजीचा दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील दस्त क्रं. अलब/२५/१९९५ कडे नोंदविण्यात आलेला श्री. सुनील भाऊ म्हात्रे लिहून घेणार व निशा एन्टरप्रायझेस तर्फे पार्टनर शेखर गंगाधर ब्रम्हे यांच्यामध्ये झालेला मौजे अलिबाग येथील सि. स. ८२८ अे, ८२८ बी, ८२८ के, या मिळकतीवर बांधण्यात आलेली निशा अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अलिबाग या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं. ६. व अलिबाग नगरपरिषद मालमता क्रं. जुना १४१५ व नवीन Z1STS००१६८१ क्षेत्र ५९० चौ. फूट या मिळकती संदर्भातील खरेदीखताचा मूळ दस्त. हा या नोटीसचा विषय आहे.

अलिबाग
दि. १३/१०/२०२१

सही/-
ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे
१०३, पहिला मजला,
ओम चिंतामणी चेंबर्स, बँक ऑफ इंडिया जवळ बालाजी नाका अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

प्रथम स्मृतीदिन

कै. सौ.वनिता बाळकृष्ण पाटील
प्राथमिक शिक्षिका कणे-पेण
(मृत्यू - मंगळवार १३/१०/२०२० तिथी वद्य-११)

''अशी पाखरे येती, आणिक स्मृती ठेवूनी जाती
दोन दिसाची दौलत सारी दोन दिसाची नाती'

-भावपूर्ण श्रद्धांजली-

पतीः बाळकृष्ण पाटील, मुलेः सौ. कल्पना, सौ.उज्वला, सौ. दर्शना व हेमंत, नातवंडेः शशांक, मानस, निधी, अद्या
सूनः-डॉ.प्रियांका व पाटील परिवार, तरे परिवार

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्रीमती प्रिती उदेश कोंडेकर, पुर्वाश्रमीची प्रिती बाळकृष्ण पाटील, ४०२, महावीर ओरनेट, प्लॉट नं. १३ ब बालाजी गार्डन जवळ, सेक्टर ११ कोपरखैरणे नवी मुंबई ठाणे ४००७०९ २) श्रीमती निहारिका निलम, पिंगळे, पुर्वाश्रमीची दिपा बाळकृष्ण पाटील, रा. ५०१, पांडव कुंड को. ऑप हौस. सोसा, टेंनीपाडा रोड, भांडुप पश्चिम, महाराष्ट्र ४०००७८ ३) श्रीमती स्मिता अनुजकुमार गडीया, पुर्वाश्रमीची स्मिता बाळकृष्ण पाटील, रा. १२३, शिव महल, ३ रा मजला, प्लॉट नं. १८, डॉ. महेश्वरी रोड, हॉकृनंबर समोर डोंगरी, मुंबई ४००००९ यांचे पुर्वगामी मालकीची, वडिलोपार्जित ताबेकब्जा वहिवाटीची मौजे-आंबेपूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स.नं. २७, हिस्सा नं. १/अ/१, क्षेत्र ०.४१.७० हे.आर., पो.ख. ०.०१.०० हे.आर. एकूण ०.४२.७० हे.आर., आकार रु. ०.७५ पै. आणि मौजे-आंबेपूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स.नं. २७ हिस्सा नं. १/ब, क्षेत्र २४.००.०० आर.चौमी आकार २४०.०० रु. पै. हि बिनशेती मिळकत आहे.

अशी परिस्थिती असताना १) श्री. राजेश बाळकृष्ण पाटील, २) श्री. परदेशी बाळकृष्ण पाटील, ३) श्री. शैलेश बाळकृष्ण पाटील, ४) कै. विजय बाळकृष्ण पाटील (मयत) तर्फे वारस ४/१) श्रीमती शिला विजय पाटील, ४/२) श्री. समीर विजय पाटील, ४/३) श्री. आकाश विजय पाटील, ४/४) श्रीमती पुनम नितीन गंभीर, ४/५) श्री. समुद्र विजय पाटील, ५) कै. सागर बाळकृष्ण पाटील (मयत) तर्फे वारस ५/१) श्रीमती सोनल सागर पाटील यांनी वर नमूद मिळकतीच्या ७/१२ सदरी त्यांच्या असलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत विक्रीस काढली असल्याने आमचे अशिलाचे निदर्शनास आले आहे. सदर मिळकतीत आमचे अशिलांचे ताबेकब्जातील मिळकत आहे. सदरची विक्री केल्यास आमचे अशिलाचे हक्कावर बाधा येणार आहे. आमचे अशिलांनी सदर व्यक्तींविरुद्ध सदर मिळकतीसंदर्भात मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात आर.टी.एस. अपिल नं. ६१/२०२१ प्रमाणे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाचेकामी आमच्या अशिलांनी सामनेवाला यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट केलेले आहे. सदरील अपिल अद्याप न्यायप्रविष्ट आहे. अशी परिस्थिती असताना सुद्धा वर नमुद व्यक्तींनी सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी दाखल असलेल्या त्यांच्या नावाचा गैरफायदा घेऊन आमचे अशिलांचे अपरोक्ष व मा. न्यायालयाच्या अपरोक्ष सदर मिळकत परस्पर विकण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे.

तरी सदर मिळकतींच्या विक्री व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणत्याही व्यक्तीने या मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारे व्यवहार केल्यास तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. अशाही परिस्थितीत तसा कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल त्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १२.१०.२०२१

सही/-
ॲड. समीर नाईक
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग
मोबाईल- ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-कांदळे, ता. रोहा येथील खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकत आमच्या नावी कब्जेदार म्हणून गावचे कागदोपत्री दाखल असून आमच्या नावे कब्जा व वहिवाटी खाली आहेत. सदर जमिनीचे इतर हक्कांत धोंडू गोविंद गायकवाड शर्तीने घेणार असा शेरा दाखल आहे तो कमी करणेसाठी मे तहसिलदार साहेब रोहा यांजकडे अर्ज केला आहे.

तरी सदर मिळकतीचे इतर हक्कांत धोंडू गोविंद गायकवा, शर्तीने येणार हे कमी करणेसाठी कोणाची काहीही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत मे. तहसिलदार साहेब रोहा किंवा खाली सही करणार यांजकडे लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. सदर मुदतीत कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास इतर हक्कातील नाव कमी केले जाईल व मागाहून येणाऱ्या हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

मौजे- कांदळे, ता. रोहा, जि. रायगड

गट नं.	क्षेत्र	आकार	मालकाचे नाव
७१ ९१	०.१४.० १-७९-०	०-०८ ६.२७	मंगेश केशव गायकवाड वगैरे

दि. १२/१२/२०२१

पत्रव्यवहाराचा पत्ता
श्री. मंगेश केशव गायकवाड
रा.कांदळे (बेलवाडी)
ता. रोहा, जि. रायगड
मो.नं. ८८७९७६२४०४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्रीमती प्रिती उदेश कोंडेकर, पुर्वाश्रमीची प्रिती बाळकृष्ण पाटील, ४०२, महावीर ओरनेट, प्लॉट नं. १३ ब बालाजी गार्डन जवळ, सेक्टर ११ कोपरखैरणे नवी मुंबई ठाणे ४००७०९ २) श्रीमती निहारिका निलम, पिंगळे, पुर्वाश्रमीची दिपा बाळकृष्ण पाटील, रा. ५०१, पांडव कुंड को.ऑप हौस. सोसा, टेंनीपाडा रोड, भांडुप पश्चिम, महाराष्ट्र ४०००७८ ३) श्रीमती स्मिता अनुजकुमार गडीया, पुर्वाश्रमीची स्मिता बाळकृष्ण पाटील, रा. १२३, शिव महल, ३ रा मजला, प्लॉट नं. १८, डॉ. महेश्वरी रोड, हॉकृनंबर समोर डोंगरी, मुंबई ४००००९ यांचे पुर्वगामी मालकीची, वडिलोपार्जित ताबेकब्जा वहिवाटीची मौजे-दिवलांग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे स.नं. २, क्षेत्र ००.१६.०० हे.आर., आकार रु. ०.११ पै. ही मिळकत आहे.

अशी परिस्थिती असताना १) श्री. राजेश बाळकृष्ण पाटील, २) श्री. परदेशी बाळकृष्ण पाटील, ३) श्री. शैलेश बाळकृष्ण पाटील, ४) कै. विजय बाळकृष्ण पाटील (मयत) तर्फे वारस ४/१) श्रीमती शिला विजय पाटील, ४/२) श्री. समीर विजय पाटील, ४/३) श्री. आकाश विजय पाटील, ४/४) श्रीमती पुनम नितीन गंभीर, ४/५) श्री. समुद्र विजय पाटील, ५) कै. सागर बाळकृष्ण पाटील (मयत) तर्फे वारस ५/१) श्रीमती सोनल सागर पाटील यांनी वर नमूद मिळकतीच्या ७/१२ सदरी त्यांच्या असलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत विक्रीस काढली असल्याने आमचे अशिलाचे निदर्शनास आले आहे. सदर मिळकतीत आमचे अशिलांचे ताबेकब्जातील मिळकत आहे. सदरची विक्री केल्यास आमचे अशिलाचे हक्कावर बाधा येणार आहे. आमचे अशिलांनी सदर व्यक्तींविरुद्ध सदर मिळकतीसंदर्भात मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात आर.टी.एस. अपिल नं. ६१/२०२१ प्रमाणे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाचेकामी आमच्या अशिलांनी सामनेवाला यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट केलेले आहे. सदरील अपिल अद्याप न्यायप्रविष्ट आहे. अशी परिस्थिती असताना सुद्धा वर नमुद व्यक्तींनी सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी दाखल असलेल्या त्यांच्या नावाचा गैरफायदा घेऊन आमचे अशिलांचे अपरोक्ष व मा. न्यायालयाच्या अपरोक्ष सदर मिळकत परस्पर विकण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे.

तरी सदर मिळकतींच्या विक्री व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणत्याही व्यक्तीने या मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारे व्यवहार केल्यास तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. अशाही परिस्थितीत तसा कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल त्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १२.१०.२०२१

सही/-
ॲड. समीर नाईक
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग
मोबाईल- ९७६७०१०९०२

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कै. श्री. अशोक नारायण शेट, स्मरणार्थ अलिबाग

कै. श्री. काशिनाथ हिरू म्हात्रे, स्मरणार्थ

कै. शकुंतला मधुसूदन अनगळ, स्मरणार्थ अलिबाग

लायन्स क्लब ऑफ अलिबाग

सौ. रतनबेन मोहनलाल नागडा, अलिबाग

माथेरानमध्ये मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन



पान ८ वर

कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२१

किंमत ४ ₹

करंजा गावातील रस्त्यांची दुरवस्था

पान ६ वर

आदर्श एक विश्वास

आदर्श पतसंस्था

मुख्य कार्यालय : 'आदर्श भवन', श्रीबाग नं.३, ता.अलिबाग, जि.रायगड.
अधिक माहिती करीता संपर्क: ९११२३०६८८८

पुरुष व स्त्रिया यांचे दुचाकी इलेक्ट्रीकल वाहन खरेदीचे स्वप्न पूर्ण करणारी योजना

प्रति रु. १०,००० /- कर्जास रु. ३३७/- हप्ता

* मुदत: ३ वर्षाकरीता
* कमीत कमी कागदपत्रे
* कोटेशनच्या ७५% कर्ज उपलब्ध (वाहन रजिस्टर असेल तर)
* कोटेशनच्या ५०% कर्ज उपलब्ध (वाहन रजिस्टर नसेल तर)

म ह त्वा चे

निवडणूक बाँडमधून शिवसेनेला १११ कोटी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आम आदमी पक्ष, डीएमके, जनता दल युनायटेड, शिवसेना यांच्यासह १४ प्रादेशिक पक्षांनी त्यांना निवडणूक रोख्यांच्या रूपात मिळलेली देणगी जाहीर केली आहे. 'असोसिएशन ऑफ डेमोक्रटिक रिफॉर्म्स'ने तयार केलेल्या अहवालात हा तपशील जाहीर केला आहे. सन २०१९-२० या वर्षात मिळालेल्या या रोख्यांची किंमत ४४७.४९ कोटी रुपये आहे. शिवसेनेला १११.४० कोटींचे निवडणूक रोखे मिळाले आहेत. सन २०१९-२० या वर्षात ४२ प्रादेशिक पक्षांना एकूण ८७७.९५७ कोटींचे उत्पन्न मिळाले. यात सर्वाधिक देणगी ही १३०.४६ कोटींची असून, एकूण उत्पन्नात त्याचा वाटा १४.८६ टक्के आहे.

राज्यात रुग्णांची संख्या पुन्हा २ हजारांवर

मुंबई: राज्यात आज कालच्या तुलनेत कोरोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत पुन्हा वाढ झाली आहे. तसेच आज मृत्यूसंख्याही वाढली असल्याने काहिशी चिंताजनक स्थिती आहे. मात्र राज्यातील एकूण सक्रिय रुग्णसंख्याही कमी होत बरे होणाऱ्या रुग्णांची संख्याही वाढल्याने दुसरीकडे दिलासाही मिळाला आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज दिवसभरात राज्यात २ हजार ०६९ इतक्या नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. काल ही संख्या १ हजार ७३६ इतकी होती. तर आज दिवसभरात एकूण ३ हजार ६१६ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत.

अमित खरे पंतप्रधान मोदींचे नवे सल्लागार

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सल्लागार म्हणून माहिती व नभोवाणी मंत्रालयाचे माजी सचिव अमित खरे यांची मंगळवारी नियुक्ती झाली. उच्च शिक्षण सचिव पदावरून ते ३० सप्टेंबरला निवृत्त झाले आहेत. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने खरे यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. यासंबंधीचा आदेश आज जारी करण्यात आला. त्यांची ही नियुक्ती कंत्राटी पद्धतीवर केली असून त्यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल किंवा पुढील आदेश येईपर्यंत ते या पदावर असतील.

आजपासून पोलीस भरती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील पोलिस वाहन दलाच्या आस्थापनेवरील चालक आणि शिपाई या पदांसाठी पोलिस भरतीसाठी लेखी परिक्षा १३ ऑक्टोबर २०२१ रोजी घेण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने या परिक्षार्थ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी परिक्षाकेंद्रांवर कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. ८१ पोलिस शिपाई आणि २७ वाहन चालक अशा १०८ पदांसाठी तब्बल ११ हजार अर्ज आले असून त्यांची लेखी परिक्षा घेण्यात येणार असल्याचे पोलिस सुत्रांनी सांगितले. शहरातील अरुणकुमार वैद्य हायस्कूल तसेच जेएसएम महाविद्यालयात परिक्षा केंद्र उभारण्यात आले असून बुधवारी १ हजार १०० विद्यार्थ्यांची लेखी परिक्षा होणार असल्याचे समजते.

अलिबाग-रामराज-रोहा रस्त्यासाठी

आज शेकापचा एल्गार

। अलिबार । शहर प्रतिनिधी ।

आज शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. अलिबाग रामराज रस्त्याची सद्यस्थिती अत्यंत भयावह असून रस्त्याची दुरावस्था झाली आहे. खड्डे, दगडगोटे, चिखल यामुळे या जीवघेण्या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत कठीण झाले आहे. सकाळी ९ वाजता खानाव येथे पुकारण्यात आलेल्या या आंदोलनात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन शेकापतर्फे करण्यात आले आहे. या आंदोलनाला शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, तालुका चिटणीस अनिल पाटील व शेकापचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

आता निवेदन नाही, आता आंदोलन

शेकाप वर्धापनदिनी सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी यासंदर्भात इशारा देत टक्केवारीत अडकलेल्या अलिबाग-रामराज-रस्त्यासाठी रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. अलिबाग रोहा रस्ता आ. जयंत पाटील, तत्कालिन आमदार पंडित पाटील यांच्या प्रयत्नातून २२५ कोटी करुन निविदा काढल्या. या रस्त्याची वर्क ऑर्डर काढली. मात्र सत्तापालट झाल्यानंतर टक्केवारीवरुन रस्ता तसाच राहिला आहे.

आ. जयंत पाटील यांनी वर्क ऑर्डर आणत नितीन गडकरीं यांचेकडे पाठपुरावा करीत निधी देखील मंजुर करुन घेतला. मात्र टक्केवारीत अडकलेल्या या रस्त्याचे काम आपण पावसाळ्यानंतर सुरु करण्याचा निर्धार जयंत पाटील यांनी केला होता. त्यानुसार शेकापक्षाने निर्णय घेत बंद पडलेले काम पावसाळा संपल्यानंतर चालू करण्याचा शब्द दिला होता. त्यामुळे सदर काम चालू करायला भाग पाडण्यासाठी शेकापने आता 'निवेदन नाही तर आंदोलन' असा पवित्रा घेतला आहे.

रस्त्याच्या दुरावस्थमुळे सामन्य नागरिक जे कामानिमित्त नोकरी धंद्याच्या निमित्ताने रोज अप-डाऊन करतात त्यांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.

यंदा दिवाळी पहाट साजरी करता येणार

सिनेमासह नाट्यगृह होणार खुले

। मुंबई । वृत्तसंस्था ।

गेल्या दोन वर्षांपासून कोव्हिडमुळं दिवाळी पहाटं सारखे सार्वजनिक कार्यक्रम होऊ शकले नव्हते मात्र यंदा दिवाळी पहाटसारखे कार्यक्रम घेण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. तसेच यासंदर्भात नव्या एसओपी देखील जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार येत्या २२ ऑक्टोबरपासून सिनेमागृह, नाट्यगृह त्याचबरोबर बंदिस्त सभागृह आणि मोकळ्या जागेत होणारे सांस्कृतिक कार्यक्रमांना परवानगी देण्यात आली आहे.

सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी नियमावली अशी असणार आहे. कार्यक्रमाला प्रवेश देताना शरीराचं तापमान तपासणं बंधनकारक, बंदिस्त सभागृहात एकूण क्षमतेच्या ५० टक्के प्रेक्षकांना परवानगी, मोकळ्या जागेतील कार्यक्रमांसाठी कार्यक्रमांच्या ठिकाणी ६ फुटांचं अंतर राखणं बंधनकारक, मोकळ्या जागेतील कार्यक्रमाचं स्वरुप बघून स्थानिक प्रशासन देणार परवानगी, कार्यक्रमाचे आयोजक, प्रेक्षक या सर्वांना मास्क घालणं बंधनकारक, बाल कलाकारांव्यतिरिक्त सर्वांचे लसीकरण पूर्ण झालेलं असणं बंधनकारक, गर्दीच्या नियंत्रणासाठी आयोजकांकडे सुरक्षा व्यवस्था असावी, खुल्या जागेत कार्यक्रमस्थळी खाद्यपदार्थ, पेय विक्रीला बंदी, रंगभूषाकारांना पीपीई कीट वापरणं बंधनकारक. तर सिनेमागृहांसाठी नियमावली पुढीलप्रमाणे राहील, •› पान २ वर

मरीन ड्राईव्हवर उभे राहणार मराठी भाषा भवन

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोर मंगळवारी मरीन ड्राईव्ह येथे उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवन प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई उपस्थित होते.

मराठी भाषा विभागातर्फे मराठी भाषा भवन मुख्य केंद्र प्रस्तावित आहे. इमारतीच्या बांधकामासाठी स्पर्धा घेऊन वास्तूविशारदाची निवड करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेअंतर्गत वास्तूविशारदांनी मंगळवारी सादरीकरण केले. यावेळी चार नामांकित वास्तुविशारदांनी आपले स्वतंत्र प्रस्ताव मांडले. यामध्ये प्रदर्शन दालन सभागृह, परिषद दालने, ग्रंथालय असे विभाग दर्शविण्यात आले. या प्रकल्पासाठी शासनाने २५०० चौ.मीटर आकाराचा भूखंड मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरित केला आहे. डिसेंबर २०२१ मध्ये बांधकामास सुरुवात करण्यात येईल तर पुढील अठरा महिन्यात मराठी भाषा भवन खुले केले जाईल, अशी माहिती मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी दिली.

एकनाथ खडसेंना मोठा धक्का

मुंबई : एकेकाळी भाजपाचे फायरब्रँड नेते असलेले मात्र नंतर पक्षांतर्गत मतभेदांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झालेल्या एकनाथ खडसेंना मोठा धक्का बसला आहे. पुण्यातील भोसरी जमीन घोटाळा प्रकरणी एकनाथ खडसे यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यांच्याविरोधात आज मुंबई सत्र न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केलं आहे. या प्रकरणी त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, सुनावणीदरम्यान त्यांचा अर्ज फेटाळून लावण्यात आला.

महाराष्ट्रात लोडशेडिंग करणार नाही

वीज उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची उर्जामंत्र्यांची माहिती

। भुसावळ । वृत्तसंस्था ।

कोळसा टंचाईमुळे राज्यातील वीज निर्मिती कमी झाली असून गरजेनुसार महागड्या दराने वीज खरेदी करून ग्राहकांना वीजेचा पुरवठा केला जात आहे. राज्यात कुठेही भारनियमन केले जात नसून वीज उत्पादन वाढविण्यासाठी योग्य नियोजन केले जात आहे, अशी माहिती राज्याचे ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली आहे. राज्यातील कोळसा टंचाई आणि त्यामुळे वीज निर्मितीत झालेली

घट याबाबत त्यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. राज्यात मागणीच्या तुलनेत ३ हजार मेगावॅट वीजेची कमतरता जाणवत आहे. ही वीजेची तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी पर्यत्न करीत आहे असे उर्जामंत्री नितीन राऊत म्हणाले.

महावितरणने सुद्धा त्यांची एकूण वीजेची मागणी १८,१२३ मेगावॅट आणि मुंबईसह एकूण मागणी २०,८७० मेगावॅट सायंकाळी पिक डिमांड पूर्ण केले आहे. महानिर्मितीने वीज उत्पादनामध्ये उत्तम समन्वय राखल्याने कोळश्याची आवक वाढली. वीज उत्पादन वाढूनसुद्धा कोळसा साठ्यात सुधारणा आहे. भुसावळ येथे वीज •› पान २ वर

देशांतर्गत विमानसेवा पूर्ण क्षमतेनं होणार सुरू

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

कोरोना महामारीच्या काळात लावण्यात आलेले हवाई वाहतुकीवरील निर्बंध आता पूर्णपणे हटवण्यात आले आहेत. त्यानुसार आता १८ ऑक्टोबरपासून विमान कंपन्या कोणत्याही बंधनाशिवाय देशांतर्गत उड्डाणं करू शकणार आहेत. नागरी उड्डयन मंत्रालयाने मंगळवारी हवाई प्रवासासाठी प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन

नवी नियमावली जाहीर

ही घोषणा केली आहे.

कोरोना महामारीच्या काळात पुर्णपणे बंद करण्यात आलेली हवाई वाहतूक व्यवस्था आता पुर्ववत झाली आहे. त्यानुसार आता ८५ टक्के प्रवासी क्षमतेची मर्यादा काढून टाकली जाईल. त्यामुळे हवाई पुन्हा एकदा विमानं पुर्ण क्षमतेनं उड्डाण करू शकणार आहेत.

महिलेला ऑनलाईन गंडा ऑनलाईन मद्य खरेदी महागात

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

लग्नात पाहुण्यांसाठी लागणाऱ्या सवलतीच्या दरातील ऑनलाईन मद्य खरेदी करणाऱ्या महिलेला भामटयांनी गंडा घालत तब्बल दीड लाखाची फसवणूक केली आहे.

गोंधळपाडा अलिबाग येथील रहिवाशी असणाऱ्या या महिलेने पी के वाईन्स या पेजवर जाउन तेथील रजिस्टर मोबाईल नंबर वर फोन करून वाईन्सची •› पान २ वर

अलिबाग तालुक्यातील घरफोड्या उघडकीस

चौघांच्या टोळीला अलिबाग पोलीसांनी केले जेरबंद

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यासह जिल्ह्यात वाढत्या घरफोड्या आणि चोऱ्यांच्या घटनांमुळे रायगड पोलिसांची झोप उडाली होती. त्यामुळे या गुन्ह्यांच्या घटना उघडकीस आणण्याचे आव्हान पोलिसांवर होते. त्यानुसार अलिबाग तालुक्यातील सात ठिकाणच्या वेगवेगळ्या घटनांमधील चौघांच्या टोळीला जेरबंद करण्यात अलिबाग पोलिसांना यश आले आहे. या चौघांना पोलिस कोठडीत ठेवण्यात आले असून आणखी गुन्हे उघडकीस होण्याची शक्यता पोलिस उपविभागीय अधिकारी सोनाली कदम आणि पोलिस निरीक्षक शैलेश सणस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

गेल्या एक ते दीड महीन्यांपासुन अलिबाग शहर व परीसरात घरफोडयांचे सत्र चालु झाले होते. २६ ते २८ ऑगस्ट दरम्यान रेवस बायपास रोडलगत कुष्ण संगम सोसायटी मधील गाळा नंबर २ मध्ये असलेले फायनान्स कंपनीचे कार्यालय, तसेच गाळा नंबर ३ मध्ये ओम साई मोटर्स व आदर्श बिअरशॉपी विद्यानगर येथील दुकानाचे लोखंडी शटर उपकवुन घरफोडी करून किंमती मालाची चोरी केली होती. त्याचप्रमाणे ३ ते ५ सप्टेंबर दरम्यान शिवम भगश घरत यांच्या वाडगाव फाटा येथील घरत कलेक्शन या दुकानाचे शटर अज्ञात चोरटयानी उपकवुन दुकानातील नविन शर्ट, पॅन्ट, ट्रॅकपॅन्टची चोरी केली होती. याच दरम्यान खडताळपुल बामणोली येथील हनुमान मंदीर व थळ गावचे टेकडीवरील दत्त मंदीरात घरफोडया चोऱ्या करून मंदीरातील दान पेटया लांबविल्या होत्या. तसेच ०७ ते ०८ ऑक्टोबर दरम्यान कुरूळ येथील करण हार्डवेअर दुकानाचे लोखंडी शटर उपकवुन •› पान २ वर

नकाराला झुगारून निर्धाराला प्राधान्य

। सायली पाटील ।

अलिबाग ।

कितीदा जरी नकार आला,
समजाविले तिने तिच्या मनाला,
नकार जरी भारदस्त झाला,
प्राधान्य दिले तिने आवडीला.

या ओळींचं तंतोतंत अनुकरण करत जसं एखाद्याने आयुष्य जगावं अगदी तसच आयुष्य जगणाऱ्या, घरच्यांच्या बोलण्यापलीकडे जाऊन स्वत:ची आवड जोपासणाऱ्या, आयुष्याकडे अपेक्षेच्या नव्हे तर आवडीच्या दृष्टीकोनातून पाहणाऱ्या, स्वत:ची आवड जोपासत स्वत:चं अस्तित्व निर्माण करणाऱ्या एका नवदुर्गेची कहाणी. ही कहाणी आहे जगाच्या बोलण्याला न जुमानता स्वत:ला सिद्ध करण्यासाठी धडपड करणाऱ्या अलिबाग मधील परहूरपाडा येथील नम्रता म्हात्रे या नवदुर्गेची.

परहूरपाडा येथे राहणाऱ्या नम्रता म्हात्रे या आशा सेविका म्हणून काम करतात. कोणाचच आयुष्य हे साधं-सोप, खाचखळगे नसणारं अजिबात नसतं. कधी-कधी कोणाची परिस्थिती नसते तर कधी-कधी कोणाला आयुष्याची साथ मिळत नसते. नम्रता यांनासुद्धा शिक्षणाची फार आवड होती परंतु घरची परिस्थिती तशी बेताचीच असल्याने इयत्ता पाचवीनंतर लगेचच त्यांना शाळा सोडावी लागली. परंतु एखाद्या गोष्टीची अगदी मनापासून आवड असली तर कधी-कधी शिक्षणाचीही गरज भासत नाही, हेच खरे.

कमी शिक्षण, घरच्यांचा नकार, बिनपगारी नोकरी या सर्व गोष्टी असतानादेखील कशालाही न जुमानता स्वत:च्या आवडीला प्राधान्य देऊन पाहिलेलं स्वप्न त्यांनी पूर्ण केलं. आशा सेविका म्हंटलं की पगार हा नसतोच त्यामुळे जेव्हा काम असेल त्यावेळेस फक्त कामाप्रमाणे ठरलेलं मानधन •› पान २ वर

> मला माहेरून व सासरहून अनेकदा कामावर कशाला जायला हवयं? नको जात जाऊस असं अनेकदा आजही सांगतात. परंतु मला या कामाची आगोदरपासूनच फार आवड असल्याने मी हे काम शेवटपर्यंत करतच राहणार आहे. मला या कामात आनंद वाटतो. त्यामुळे मी हे काम करणे कधीच सोडणार नाही.
> – नम्रता म्हात्रे, परहूरपाडा.

खादी किंग स्वदेशी तुमच्यासाठी रुबाबदार खादी शर्ट प्रदर्शन व विक्री

खादी फुल शर्ट फक्त रु. 330/-
प्युअर कॉटन व्हाईट फुल्ल शर्ट फक्त रु. 400/-
शॉर्ट हाफ कुर्ता फक्त रु. 350/-
नेहरु फुल्ल कुर्ता फक्त रु. 500/-
कडक खादी फुल्ल शर्ट फक्त रु. 480/-

अगदी शिलाईच्या किंमतीत मिळेल.
स्वस्त महासेल सुरु.. मार्केटपेक्षा स्वस्त किंमतीत
सोलापूर हॅन्डलूम
बेडशीट,पंचे,भोजन पट्टी,पडदे,सतरंजी, रूमाल व खूप काही
*मोठी साईज 46, 48, 50 पर्यंतचे शर्ट उपलब्ध.

खादी हाफ शर्ट फक्त रु. 280/-
खादी कॉटन साडी फक्त रु. 350/-
डिझायनर कुर्तीज् रु. 350/- मध्ये खादी कुर्तीज,पटीयाला, अनारकली,एम्बरायडरी कुर्तीज,स्कर्टस
कडक खादी हाफ शर्ट फक्त रु. 430/-

कॉटन साडी सेल रु.500/- ते रु.700/- ची साडी फक्त रु.350/- मध्ये

जगे बिल्डींग आसरा लॉज समोर, मारुती नाका, बीच रोड अलिबाग-रायगड
महात्मा गांधी मंदिर वाचनालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पेण, रायगड

संपादकीय

मजुरांच्या मजुरीचा विजय

ऑक्टोबर महिन्याचा दुसरा आठवडा नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या घोषणेचा असतो. त्यानुसार भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकीयशास्त्र तसेच साहित्य आणि शांततेचे पारितोषिक जाहीर झाले आणि शेवटचे अर्थशास्त्राचे नोबेल सोमवारी जाहीर झाले. अर्थशास्त्र आपल्या जीवनावर खूप प्रभाव टाकणारे असले तरी त्यातील क्लिष्टतेमुळे तसेच, हा विषय समजून घेण्यासाठी गणितांची प्रमेये जाणून घ्यावी लागत असल्याने, त्यापासून लांब राहण्याची प्रवृत्ती असते. यंदाचे अर्थशास्त्राचे नोबेल हे अनेकार्थांनी महत्त्वपूर्ण आहे. डेव्हीड कार्ड, जोशुआ अँग्रीस्ट आणि गिडो अँबिन्स या तीन विजेत्यांनी आपल्या नित्याच्या जगण्याशी संबंधित काही महत्त्वाच्या प्रश्नांना ठोस उत्तरे दिली आहेत आणि महत्त्वाचे गैरसमजही दूर केले आहेत. त्याचबरोबर अर्थशास्त्र माणसाच्या जगण्याशी किती जवळून जोडले गेलेले आहे ते समजून घेण्यासाठी नवीन संशोधन पद्धती प्रस्थापित केली, ज्याला 'नैसर्गिक प्रयोग' असे म्हटले जाते. या पद्धतीचा उपयोग काही वर्षांपूर्वी भारतातील पाऊसपाणी आणि शेतकऱ्यांची मिळकत यातील संबंध शोधण्यासाठी केला गेला होता. त्याच तत्वाचा वापर करुन या तीन अर्थशास्त्रज्ञांनी रोजगार, मजुरी, स्थलांतर, वेतनवाढ या रोजच्या प्रश्नांना वस्तुनिष्ठ पुराव्यानिशी ठोस उत्तरे दिलीच, शिवाय त्याबद्दल असलेले काही प्रतिकूल आणि पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनही बदलून टाकले आहेत. त्यांनी नेमके काय योगदान दिले हे पाहण्यासाठी आपण आपल्याला पडणाऱ्या काही प्रश्नांकडे पाहूया. सर्वसाधारणपणे असा समज आहे आहे की जेव्हा एका प्रदेशात स्थलांतरित येतात तेव्हा तेथील स्थानिकांचा रोजगार बुडतो. उदा. आपल्याकडे उत्तर प्रदेश, बिहारमधून येणाऱ्या मजुरांमुळे, स्थानिकांचा रोजगार बुडतो असे मानून काही राजकीय पक्ष बचावात्मक भूमिका घेत असतात. तसेच, शिक्षणातील अतिरिक्त गुंतवणूक ही त्या विद्यार्थ्याला भविष्यकालीन अतिरिक्त मिळकतीची हमी असते का? असाही प्रश्न आपल्याला पडतो. याचे उदाहरण म्हणजे आपण आपल्या मुलांना चांगले, जास्तीचे शिक्षण देतो, जेणेकरून आपल्याला वाटते की त्यांना त्यांचा अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी फायदा होईल. अजून एक प्रश्न चर्चिला जातो तो म्हणजे वेतनवाढ केली रोजगाराच्या संधी कमी होतात का? म्हणजे जर नोकरी देणाऱ्या मालकाला जास्तीचा पगार द्यावा लागला तर त्याचा कल कमी लोकांना नोकरी देण्याकडे असेल. म्हणजे नोकरीच्या संधी कमी होतील. या सर्व प्रश्नांबाबत या अर्थशास्त्रज्ञांनी दाखवून दिले की आपण जसे समजतो तसे वास्तव असेलच असे नाही. आपली मते चुकीची आहेत कारण हा जो या दोन घटकांमध्ये आपण कार्यकारण भावाचा संबंध जोडतो, तो तसा असेलच असे नाही. १९८० च्या दशकात क्युबामधून लोकांना जायचे असेल तर जा, असे फिडेल कॅस्ट्रोने सांगितल्यावर अनेक जण मायामी येथे आले. डेव्हीड कार्ड यांनी या घटनेच्या अभ्यासातून दाखवून दिले की स्थानिकांच्या वेतनावर, रोजगार संधींवर या स्थलांतराचा कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. वेतनवाढ आणि नोकरीच्या संधी यातील कार्यकारणभावही तपासण्यासाठी अशा 'नैसर्गिक परिस्थितीतील घडामोडींचा अभ्यास' त्यांनी प्रस्थापित केला. सर्वसाधारणपणे असे मानले जाते की, पगार वाढवले की लोकांना कमी नोकऱ्या उपलब्ध होतात. मात्र अमेरिकेतील वेगवेगळ्या वेळी झालेल्या किमान वेतनवाढीतून त्यांनी दाखवून दिले की पगार वाढले तर रोजगाराच्या संधी कमी होतात हा समज चुकीचा आहे. तसाच चुकीचा संबंध शिक्षण आणि मिळणारे वेतन याचा संबंध लावताना होतो, हेही अन्य दोन अर्थशास्त्र जोशुआ अँग्रीस्ट आणि गिडो अँबिन्स यांनी दाखवून दिले. अर्थशास्त्राचा अंतर्भाव सामाजिक शास्त्रांत होत असल्याने अन्य विज्ञानांप्रमाणे शोध लावण्यासाठी ठरवून प्रयोग करण्यावर खूप मर्यादा असतात. कारण त्यासाठी आवश्यक असलेले 'परिस्थिती नियंत्रण' शक्य नसते. ते प्रयोगशाळेत करता येत नाहीत. भारतासारख्या मजूरप्रधान, कृषीप्रधान आणि शिक्षणाची मोठी दरी असलेल्या देशाच्या दृष्टीने या शोधांचे महत्व अनन्यसाधारण आहे. शिक्षण आणि वेतनातील इथले संबंधही या पद्धतीने समजून घेता येतात आणि समाजाला अधिक योग्य दिशेने जाण्यास धोरण आखता येते. तसेच, भारतातील मजूर आणि कामगारांच्या किमान वेतनाचा प्रश्न सोडवता येईल आणि वेतनवाढ केल्याने अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होईल, आणि रोजगाराच्या संधी कमी होतील, ही भिती आणि आडाखे खरे नाहीत, हे जाणून सुधारीत धोरणे आणता येतील. आपल्या कळीच्या प्रश्नांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी या अर्थशास्त्रज्ञांनी दिलेली आहे. त्याचा आपण उपयोग केला पाहिजे.

गांधी -गोडसे : गुन्हा आणि उदात्तीकरण!

जयंत माईणकर





पु.ल. देशपांडेंवर चित्रपट काढून स्वतःची वेगळी इमेज निर्माण करणाऱ्या महेश मांजरेकरांनी गांधी जयंतीच्या दिवशी नथुराम गोडसे या चित्रपटाची घोषणा केली. केवळ वस्तुस्थितीवर आधारित मनात कुठलाही पूर्वग्रह न बाळगता चित्रपटाची निर्मिती केली जाईल असंही त्यांनी सांगितलं.

याआधी स्व प्रदीप दळवी लिखित आणि स्व विनय आपटे दिग्दर्शित 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक ३२ वर्षांपूर्वी प्रथम रंगभूमीवर आलं. महाराष्ट्रात या नाटकाचे चक्क ७५० प्रयोग झाले.

महाराष्ट्रीय उच्चवर्णीय प्रेक्षक समोर ठेऊन केलेला हा प्रयोग होता. जो कमालीचा यशस्वी ठरला कारण महाराष्ट्रातील उच्चवर्गात गांधीजीबद्दल तथाकथित तिरस्कार आहे. शरद पोंक्षेनी नथुरामची भूमिका केली होती. नाटकाच्या सुरुवातीच्या स्वगतात गांधीहत्येनंतर पोलिसांच्या ताब्यात असलेल्या नथुरामला सावरकर पोलिसांबरोबरच दिसतात. नाटकात लिहिलेल्या प्रवेशानुसार नथुराम स्वगतात सावरकरांच्या पाया पडतो. आणि सावरकर त्याला 'चिरंजीवी भव' असा आशीर्वाद देतात. आणि आपल्या आशीर्वादाच्या पुष्ट्यर्थ सावरकर म्हणतात 'जेव्हा जेव्हा गांधींचं नाव निघेल तेव्हा तेव्हा नथुराम गोडसे हेही नाव निघेल. आणि चिरंजीवी भव या आशीर्वादाचा अर्थ नामरूपाने नथुराम चिरंजीव राहील असा घेण्यास हरकत नाही. अर्थात असा प्रसंग घडला हे स्वगतरुपी संवादात नाटककारानी दाखवलं आहे. त्यांचं नाटक बऱ्याच प्रमाणात नथुराम गोडसे याचा धाकटा भाऊ गोपाळ गोडसे यांच्या 'गांधीहत्या आणि मी' या पुस्तकावर आधारित असून स्वतः गोपाळ गोडसेला गांधी हत्या प्रकरणात २० वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. माहितीनुसार आणि उपलब्ध फोटोनुसार गांधीहत्या खटल्यात आरोपी असलेले सावरकर खटल्यातील इतर कोणाही आरोपींशी बोलत नसत. आणि कोर्टात सर्वात शेवटच्या रांगेत बसत. मात्र इतर आरोपी आपसात बोलत असत. जर नाटकात लिहिलेल्यानुसार सावरकरांनी नथुरामला चिरंजीवी भव असा आशीर्वाद दिल्याचं खरं मानलं तर ते वाक्य म्हणजे एक प्रकारे नथुरामच्या कृत्याला पोलिसांसमोर सावरकरांनी आशीर्वाद आणि पाठिंबाही दिला असं म्हटलं पाहिजे. पण सर्वोच्च न्यायालयाने तर सावरकरांची गांधीहत्येच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली होती. आणि सावरकारांचा सर्व कृत्ये आपल्या सहकाऱ्याकडून करवून घेऊन स्वतः नामानिराळे राहण्याचा एकूण स्वभाव पाहता त्यांनी पोलिसांच्या समोर असा आशीर्वाद दिला असण्याची शक्यता नगण्य आहे. मग लेखकाने विचारस्वातंत्र्याचा फायदा घेत सावरकरांनी नथुरामला दिलेल्या आशीर्वादाची कपोलकल्पित कहाणी रचली की ती घटना म्हणजे दोन ओळींच्या मधील बाहेर न आलेल्या वस्तुस्थितीचं दर्शन आहे. माझ्या दृष्टीने चिरंजीवी भव हा पूर्ण घटनेचा टर्निंग पॉईंट आहे.

महाराष्ट्रात 'गांधी विरूद्ध गांधी' हे नाटकही यापुर्वी येऊन गेले आहे. हिंदीत 'मैने गांधी को नही मारा' हा अनुपम खेर अभिनित तसेच 'हमने गांधीजीको मार दिया' हे चित्रपटही येऊन गेले आहेत. गांधीजींचा मुलगा हिरालाल गांधी यांच्या चरित्रावर आधारीत अक्षय खन्नाचा 'गांधी माय फादर' हा गांधीजी कसे अयशस्वी पिता होते सांगणारा अनिल कपुर निर्मित सिनेमाही येऊन गेला आहे. त्यमुळे चित्रपटातून गांधीजींवर टिका नवीन नाही. रिचर्ड ऍटिनबरो या जागतिक फिल्म निर्मात्याने गांधीजीवर १९८२ साली गांधी ही अप्रतिम कलाकृती जगभरातील सिनेरसिकांसमोर मांडली.

गांधीजींची हत्या भारतीय स्वातंत्र्यानंतर अवघ्या पाच महिन्यात झाली. भारतीय स्वातंत्र्य, फाळणी, पाकिस्तानची निर्मिती, धार्मिक दंगे याना डोळ्यासमोर ठेवून गांधीजीच्या विरोधाचीही एक बाजू उभी केली जाते.गांधीजींच्या च्या मारेकऱ्यांचीही एक बाजू आहे, असा एक मतप्रवाह आहे. गेल्या ७३ वर्षांपासून हिंदुत्ववादी ती 'हत्या' नसून 'वध' होता आणि तो वध काळाची आणि देशाची गरज होती हे सांगण्याचा एक प्रयत्न आहे. हिंदू संस्कृतीत वध या शब्दाचा वापर राक्षसाला मारल्यानंतर केला जातो.जाणीवपूर्वक तो शब्द वापरून हिंदुत्ववादी गांधींची तुलना राक्षसाशी करतात. गांधीहत्येवरील गोपाळ गोडसेंचे पुस्तक याच प्रयत्नाचा भाग आहे. हा प्रयत्न अनेक कथा, कादंबऱ्या, नाटके आणि चित्रपटातून केलेला आहे.

स्टँनली वॉलपर्ट यांनी नथुरामची बाजू मांडण्याचा एक तटस्थ प्रयत्न १९६२ साली 'नाईन अवर्स टू रामा' या कादंबरीच्या माध्यमातून केला होता. त्यावर अमेरिकेत याच नावाचा चित्रपटही येऊन गेला. भारतात या दोन्हींवरही बंदी घालावी अशी मागणी कॉंग्रेसनेही केली आणि हिंदुत्ववाद्यांनीही केली होती. त्याचे एक कारण म्हणजे त्यात नथुरामचे अनैतिक सबंधही मांडले होते. 'गोकुळ शंकर' नावाचा एक भारतीय चित्रपटही या कादंबरीवर आला पण त्यावरही बंदी घातली गेली कारण तो स्टँनली वॉलपर्ट यांच्याच कादंबरीवर आधारीत होता.

कमल हसनने याच स्टँनली वॉलपर्टच्या कादंबरीवर आधारीत 'हे राम' हा चित्रपट काढला पण त्याने गांधीजींचीच बाजू मांडली आणि हत्येचे समर्थन केले नव्हते. 'नाईन अवर्स टू रामा' या कादंबरीत किंवा त्यावरील चित्रपटात गांधीजींचा तिरस्कार करणारे लोकही भारतात होते आणि त्यांनी गांधीजींची हत्या करताना त्यांची नेमकी काय भुमिका होती हे मांडले होते. एखाद्या गुन्हेगारांवर चित्रपट निघणे नवीन नाही.

भारतीय चित्रपट सृष्टीत अशा चित्रपटांची तर मांदियाळी आहे. अमिताभ बच्चनचा 'दिवार' असो शहारूख खानचा 'डर' किंवा नानावटी खून खटल्यावर आधारित अक्षयकुमारचा 'रूस्तुम' हे सर्व चित्रपट तर गुन्हेगारालाच नायक बनविणारे आहेत. आणि त्यामुळे दुर्दैवाने विकृतीलाच प्रतिष्ठा मिळते. आपल्याला दिवारच्या अमिताभपासून रुस्तुम च्या अक्षय कुमारपर्यंत सर्वांच्याबद्दल आपलेपणा वाटू लागतो ते गुन्हेगार असले तरीही. आणि इथेच आपण फार मोठी चूक करतो.

महत्वाची बाब अशी की, गोडसेच्या कृत्याच उदात्तीकरण करणारे असे कितीही चित्रपट, नाटके, कथा, कादंबरी आले तरीही हिंदुत्ववाद्यांना सुद्धा गांधींच नाव घ्यावं लागतच. मोदींना नुकत्याच झालेल्या अमेरिका भेटीत गांधीजींचाच दाखला द्यावासा वाटला . तिथे त्यांना हेडगेवार, गोळवलकर किंवा सावरकर आठवले नाहीत. नथुरामचा तर प्रश्नच नाही. १९३४ पासून गांधीहत्येचे ३० जानेवारी १९४८ पर्यंत गांधीहत्येचा पाच वेळा प्रयत्न केला गेला. भारत-पाक फाळणी, ५५ कोटी, मुस्लीम अनुनय अशी काही कारणं सांगून त्यांच्याबद्दल द्वेषाची बिजे पेरण्याचे प्रयत्न केले गेले. या कारणांनाच पुढे करून आजही गांधीहत्येचं समर्थन आणि उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे.

७९ वर्षांच्या वृद्धाला तीन गोळ्या मारून ठार करणे हा केवळ गुन्हा नव्हे तर अक्षम्य अपराध आहे.आणि गुन्हा हा कोणत्याही कारणामुळे घडलेला असला तरीही गुन्हा हा गुन्हाच राहतो. आणि कुठल्याही गुन्ह्याच पद्धतशीरपणे उदात्तीकरण करण हेही तितकंच अक्षम्य आहे. मांजरेकरांना चित्रपट काढण्याचा अधिकार निश्चित आहे. कारण भारत हा लोकशाहीवादी आणि व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवणारा देश आहे. मात्र अशाच प्रकारचे चित्रपट इंदिरा, राजीवच्या मारेकऱ्यांवर निघाले तर त्यांनाही स्वीकारण्याची तयारी असली पाहिजे. इतकच नव्हे देवाच्या अस्तित्वावर प्रश्नार्थक चिन्ह निर्माण करणारे किंवा त्याची दुसरी बाजू सांगणारे चित्रपट आले तर हिंदुत्ववादी स्वीकारतील?

तूर्तास इतकेच!

वाचनीय

टॉलस्टॉयची एक गोष्ट

एका जमीनदाराचा एक मुलगा लहानपणी घर सोडून पळून गेला होता. जमीनदार खूप व्यथित होता. त्याने त्याचा शोध चालवला होता. अनेक वर्षं तो माणसं पाठवत होता, गुप्तचर नेमत होता, पोलिसांत तक्रारी केल्या होत्या. अनेक वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या होत्या.

जवळपास वीसेक वर्षांनी त्याला मुलाचं पत्र आलं. मी घरी परत येतोय. अमुक दिवशी अमुक वाजताच्या रेल्वेने येईन. मला घ्यायला स्टेशनवर या.

ट्रेन मध्यरात्रीच्या सुमारास पोहोचत होती. जमीनदार बग्गी जुंपून तिथे पोहोचला. ट्रेनची येण्याची वेळ दोन तासानंतरची होती. स्टेशनात थांबून वाट पाहावी लागणार होती. त्या छोट्याशा स्टेशनचा स्टेशनमास्तर त्याच्या परिचयाचा होता. तो जमीनदाराच्या सेवेत हात बांधून रुजू झाला.

त्याला घेऊन वेटिंग रूममध्ये पोहोचला. त्या रुममध्ये भिकाऱ्यासारखी लक्तरं घातलेला, तापाने फणफणलेला, बेशुद्धीच्या सीमेवर पोहोचलेला एक तरुण प्रवासी मुटकुळं करून पडला होता. जमीनदार म्हणाला, त्याला बाहेर काढा.

स्टेशनमास्तराने हमालांच्या सहाय्याने त्या तरुणाला बाहेर जिन्यापाशी नेऊन ठेवलं. जमीनदारसाहेब स्टेशनमास्तराशी गप्पागोष्टी करत मुलाची वाट पाहात बसले. आपल्या मुलाच्या लहानपणीच्या आठवणी सांगताना त्यांचे डोळे भरुन येत होते, हृदयातून आनंदाची कारंजी उसळत होती. आपल्या मुलाला इतक्या वर्षांनी भेटणार, याची उत्साही उत्सुकता त्यांच्या वर्तनातून दिसत होती.

तिकडे तो तरूण त्या थंड रात्री उघड्यावर कुडकुडत पडला होता. पहाटेपर्यंत त्याच्या कुडीतून प्राण निघून गेले. सकाळच्या वेळी कोणाच्या तरी लक्षात आलं. सगळे त्याच्याभोवती गोळा झाले. त्याच्या अंगावरच्या कपड्यांची, पिशव्यांची तपासणी झाली, तेव्हा त्यातून एक चिठ्ठी बाहेर पडली. त्यावरून लक्षात आलं की हाच त्या जमीनदाराचा मुलगा होता.

दोन तास आधीच्या ट्रेनने लवकर पोहोचला होता. वडिलांची वाट पाहात थांबला होता.

वेटिंग रूममध्ये अधीर मनाने हुक्का पीत असलेल्या वडिलांना ही खबर मिळाली, तेव्हा त्यांनी हंबरडा फोडला. ते निष्ठुर नियतीला बोल लावू लागले. थंडीच्या दिवसांत कुडकुडत पडलेला, आजारी माणूस आपलाही कोणी असू शकतो, ही शक्यता आपण कधीच लक्षात घेत नाही, हे तेव्हाही त्यांच्या लक्षात राहिलं नव्हतंच.

-ओशो

(क्रमशः)

राकेश लोहार

उद्योगही यायला हवेत!

नैसर्गिक सौंदर्य आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा वारसा लाभलेल्या कोकणात अनेक उत्तम पर्यटनस्थळे आहेत. पर्यटन व्यवसायांचा विकास करताना व्यावसायिकांनी नव्यानव्या कल्पना आणल्या पाहिजे. त्यात नाविन्य असेल, तर त्याकडे परदेशी पर्यटक चांगल्याप्रकारे आकर्षित होतील. आज अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने जगभर प्रसिद्ध आहे. याठिकाणी अशी अनेक गावे आहेत, की तेथे पुरातन वास्तू आहेत. येथे असणाऱ्या गडकिल्ले, लेण्या यांची माहिती पर्यटकांना होणे गरजेचे आहे. अलिबाग पर्यटनस्थळ म्हणून ठीक आहे. परंतु, पर्यटनक्षेत्र म्हणून घोषित झाल्यास येथील स्थानिक बेरोजगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल, यात अजिबात दुमत नाही. परंतु, त्याचबरोबर इतरही धोके आहेत. ते म्हणजे, पर्यटनक्षेत्र म्हणून एकदा घोषित झाले की, आहे त्यापेक्षाही अधिक पर्यटकांचा ओघ समुद्रकिनारे, गड-किल्ले आदी ठिकाणी वाढेल. ती काळजी घेणे मोठी जबाबदारीच ठरेल. पर्यटनासाठी जे-जे आवश्यक आहे, त्या-त्या सर्व गोष्टींनी परिपूर्ण असे अलिबाग आहे. पण, आजपर्यंत या गोष्टींचा ठेवा ज्याप्रमाणे आपण जतन करुन ठेवला आहे, त्याला कुठेतरी ठेच पोहोचण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. पर्यटनक्षेत्राामुळे अलिबाग कित्येक पटीने पुढे जाईल, जगाच्या नकाशावर वेगळे स्थान निर्माण करील. पण, हे सर्व होत असताना मागे वळून पाहिले, तर काही गोष्टी आपण गमावून बसलेल्या असू. त्यावर आपले नियंत्रण आपण कधीचे गमावून बसलेलो असू. जसे आज गोव्याचे झाले आहे. म्हणजे, गोवा आज पर्यटनाच्या दृष्टीने खूप पुढे. त्याचे नावसुद्धा आहे. पण, हे झाले पर्यटनाच्याबाबतीत. हे होत असतानाच इतर अनेक गैरकृत्यांमुळे तो ज्या गतीने प्रसिद्धीच्या झोतात पुढे येत आहे, त्यामुळे तो कितीतरी पटीने मागे ओढला जात आहे, असेच वाटते. नको त्या गोष्टींसाठीच आज गोवा प्रसिद्ध होत आहे. ते तसे आपल्या अलिबागचे व्हायला नको. त्यापेक्षा पर्यटनाबरोबरच, त्यापेक्षा अधिक पटीने जर औद्योगिकीकरणाला चालना दिली, मोठमोठ्या कंपन्या, कारखाने या ठिकाणी आणण्याचे प्रयत्न झाल्यास येथील उच्चशिक्षण घेतलेला तरुणवर्ग आहे, तो मुंबई, ठाणे, पुणे याठिकाणी नोकरी-व्यवसायानिमित्त स्थलांतर करीत आहे, ते पूर्णपणे थांबेल. याठिकाणी आज दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. त्यातून उत्कृष्ट विद्यार्थी घडतही आहेत. पण, शेवटी नोकरीचा प्रश्न येतो, तेव्हा मात्र त्याला आपलं गाव, आपलं शहर, आपला जिल्हा सोडावा लागतो. हे होता कामा नये. मला वाटते, हेच थांबायला पाहिजे. त्यासाठी दोन-तीन कंपन्या येऊन काहीच उपयोग नाही, तर अनेक कंपन्या, कारखाने येणे ही उज्ज्वल भविष्यासाठी काळाची गरज ठरेल. त्यासाठी राजकारण्यांनीसुद्धा पुढे येण्याची गरज आहे.

खारा-वारा

मनं जुळायला हवीत!

गणेशोत्सव झाला, आता नवरात्रोत्सवही होईल. त्यामुळे पुन्हा एकदा सगळीकडे लगीनघाईला सुरुवात होणार आहे. 'यंदा कर्तव्य' असणारे अनेक वधू-वरांचे आईवडील त्यासाठी आतापासूनच शोधमोहिमा सुरु करतील, यात वादच नाही. त्यात हा सुरु असलेला कोरोनाकाळ. त्यामुळे अनेकांचे जमलेले विवाह, परंतु कोरोनामुळे पुढे ढकलण्यात आलेले विवाहही आता उरकण्यात येतील. त्यामुळे पुढील महिन्यापासून बँड बाजा जोरदार असणार आहे. परंतु, सर्वांनीच एक लक्षात घ्यावे, की ज्याच्याबरोबर आपल्याला आयुष्य काढायचे आहे, त्याच्याशी अगोदर मन, विचार जुळणे गरजेचे आहे, नुसती पत्रिका जुळून काय उपयोग? आज नोकरीच्या मागे अखंडपणे धावत असताना अथवा व्यवसाय सांभाळताना आपल्या सांसारिक जीवनात आनंद व संसारसुख मिळविण्यासाठीच मनुष्यला आयुष्यभर वणवण भटकत राहावे लागते. काही वेळा घराच्या सुखरुपतेबरोबरच कुटुंबातील नाती, प्रतिष्ठा आणि ऐश्वर्य जपण्याचा पती-पत्नी प्रयत्न करतात; पण प्रेमाचे दोन गोड शब्द आणि एकमेकांची मनं समजून घेण्याचा प्रयत्न झाला नाही, तर वादळं उठतात. मन फुलासारखं नाजूक असतं, ते फुलवायचं कसब ज्या स्त्री-पुरुषांकडे असतं, तेच एकमेकांचे सर्वस्व बनू शकतात. पण, सांसारिक जीवनात काय होतं, कुणालाच कळत नाही. शरीर दृश्य असलं, तरी मन अदृश्य असतं. त्या शरीराला शृंगारसुख दिलं की आपली जबाबदारी पूर्ण होत नाही, तर शरीरसुखापेक्षा एकमेकांची मनं जुळायला हवीत आणि पती-पत्नीनं एकमेकांची मनं जिंकायला हवीत. एकमेकांवर मनापासून प्रेम करावं आणि एकमेकांवरचा विश्वास वृद्धिंगत करावा. दोन भिन्न वातावरणातून दोन भिन्न स्वभावाची माणसं जेव्हा एक होतात, तेव्हा वाद होणारच. भांड्याला भांडं लागणारच. शेवटी काय, तर लग्न म्हणजे ओढूनताणून केलेला संसार नव्हे; छत्तीस गुणांपेक्षा दोन मनांचं मीलन होणं गरजेचं आहे. त्या मनोमिलनामुळंच सुखी जीवनाला आकार व परिसस्पर्श लाभेल.

लोकसंसद

बंदवेळी दमबाजी तर निवडणुकांवेळी ढोंगी नम्रता!

काहीही म्हणा पण 'महाराष्ट्र बंद' यशस्वी झाला असेच म्हणा! हे छाती बडवून सांगणे कसे असते, ते यावेळी पाहण्यास मिळाले. दुकाने बंद करण्यासाठी व्यापाऱ्यांना कसे सांगितले जात होते, हे एकट्या राज्याने नव्हे तर देशाने पाहिले. 'आमचे नेते, कार्यकर्ते' महाराष्ट्र 'बंद'मध्ये सहभागी होण्यासाठी कोणालाही सक्ती करणार नाहीत. असे बंद जेव्हा घोषित केला, तेव्हा सांगता आले असते. पण बंद घोषित करणाऱ्यांना चांगलेच ठाऊक असावे की केवळ बंदच्या आवाहनाला कोणी दाद देणार नाही आणि आपण तोंडावर आपटू. शेवटी तसेच झाले. सत्ताधारी पक्षांतील नेते, कार्यकर्ते चालू दुकाने बंद करण्यासाठी दुकानदारांना चुकीच्या पद्धतीने सांगत होते. काय तर म्हणे आम्ही लोकप्रतिनिधी. पोटाची खळगी भरण्यासाठी मेहनत करणाऱ्यांना आडवे जाणाऱ्यांना लोकप्रतिनिधी कसे आणि का म्हणावे? झुंडशाहीला घाबरून दुकानदार दुकाने बंद करत होते. तसेच उगाचच अशांच्या नादी लागून यांच्या नजरेत का या? असा विचार करत लोकांनी घरीच थांबणे पसंत केले. आणि म्हणे बंद यशस्वी झाला. मुंबईची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेल्या बेस्ट बसेसच्या काचा फोडणे, रिक्षा चालकांच्या कानाखाली मारणे आदी कृती म्हणजे बंदकर्त्यांच्या 'निराशे'चा उद्रेक होय. अशा कृती होणे हेच सांगत होते की बंद पुकारणारे कसे तोंडावर आपटले. 'लोकांना गृहीत धरून आम्ही काहीही मनमानी करू', हे जनता कधीच खपवून घेणार नाही. तुम्ही दुकाने बंद करा, हे चढ्या आवाजात सांगणारे तुम्ही कोण? अशी बळजबरी कोणीच कोणाला करू शकत नाही. म्हणजे झुंडशाहीने आलेल्यांसमोर नमते घेत त्याने सांगितले तसे इच्छा नसतानाही करायचे. निवडणुकांच्या प्रचारावेळी हेच नेते, कार्यकर्ते ताई-दादा, काका-मामा, आजी-आजोबा, मावशी म्हणत जनतेला मतांसाठी विनवण्या करतात. बंदच्या वेळी हीच मंडळी लोकांना दमदाटी करतात. हा यांचा खरा चेहरा आहे. लोकांच्या अनेक अडचणी आहेत. त्या सोडवण्यासाठी लोकांना कितीतरी कालावधी तिष्ठत राहावे लागते. त्यासाठी काही समयमर्यादाच नाही. कारण साहेब पुष्कळ व्यस्त असतात ना ? आणि यांनी सांगितले की लगेच लोकांनी तसे करायचे. वा रे वा, हीच का तुम्हाला समजलेली लोकशाही. लोकशाहीच्या कोणत्या चौकटीत झुंडशाही येत ? गोरगरिबांच्या पोटावर पाय देण्याचे दुष्कर्म कसे असते. हेच ११ ऑक्टोबरच्या 'महाराष्ट्र बंद'मधून ठळकपणे समोर आले. लोकप्रतिनिधी मग ते कोणत्याही राजकिय पक्षाचे असोत, त्यांची आक्रमकता तसेच हुशारी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी दिसावी. बंदच्या वेळी दिसणारी आक्रमकता बिनकामाची असते.

- जयेश राणे, भांडुप

सुनील छेत्रीची अभिमानास्पद कामगिरी!

मालदीव येथे सुरु असलेल्या दक्षिण आशियाई फुटबॉल फेडरेशन आयोजित द्वैवार्षिक आंतरराष्ट्रीय पुरुष फुटबॉल चॅम्पियनशिपमध्ये खेळताना भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने नेपाळविरुद्धच्या सामन्यात गोल झळकावून ब्राझीलचे महान फुटबॉलपटू पेले यांच्या ७७ गोलच्या विक्रमाची बरोबरी केली आणि भारताच्या फुटबॉलच्या इतिहासात एक विक्रमी कामगिरी नोंदविली. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वात जास्त गोल करण्याऱ्या खेळाडूंच्या यादीत सुनील छेत्री आता तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. छेत्रीसोबत युएईच्या अली मबखौतच्या नावावरही ७७ गोल आहेत. पहिल्या स्थानावर असलेल्या पोर्तुगालच्या ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या नावावर ११२ तर दुसऱ्या स्थानी असलेल्या अर्जेंटीनाच्या लिओनेल मेस्सीच्या नावावर ७९ गोल आहेत. वास्तविक जगातील एक प्रमुख खेळ असणाऱ्या फुटबॉलमध्ये पूर्णतः क्रिकेटमय झालेला भारत बराच मागे आहे. त्यामुळे फुटबॉलला भारतात जास्त प्रसिद्धी मिळत नाही. अशा पार्श्वभूमीवर कर्णधार सुनील छेत्रीचा हा विक्रम असामान्यच म्हणावा लागेल. सुनील छेत्रीच्या या अद्वितीय कामगिरीमुळे भारतात फुटबॉलला चांगले दिवस येतील यात शंका नाही.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

सर्वसामान्यांना वेठीस धरणारा बंद नकोच

शेवटी एकदाचा ११ ऑक्टोबरचा महाराष्ट्र बंद पार पडला. बंद आयोजकांच्या म्हणजे महाविकास आघाडीच्या दृष्टीने कडकडीत व उत्स्फूर्त बंद तर विरोधकांच्या म्हणजेच भाजप व मनसेच्या मते बंदचा फज्जा उडाला. तर काहींच्या मते बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. बंद आयोजनामागे उत्तरप्रदेशातील लखीमपूर हिंसाचाराचा निषेध हे कारण असले तरी त्यासाठी महाराष्ट्रातील जनतेला वेठीस धरणे कितपत योग्य असाही सूर उमटला गेला आणि तो योग्यच होता. मागचे दीड वर्ष कोरोना निर्बंधामुळे कंबरडे मोडले गेलेला सर्वसामान्य नागरिक शिथिल झालेल्या निर्बंधामुळे हळूहळू सावरण्याच्या प्रयत्नात असताना महाराष्ट्र बंद पुकारणे खरोखरच गरजेचे होते का? याचा बंद आयोजकांनी विचार करायला हवा होता. सत्ताधार्यांनीच बंद पुकारुन जनतेस वेठीस धरणे हे चुकीचेच आहे. त्यामुळे सत्ताधार्यांनी आपला प्रभाव आजमवण्यासाठीचा केलेला हा खटाटोप होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्याचवेळी बंदचा विरोध करणाऱ्यांनीही याअगोदर बंद आयोजित केले होते हे विसरु नये. त्यांचा खरंच बंदला विरोध असेल तर भविष्यात त्यांनीही सर्वसामान्यांना त्रासदायक ठरेल अशा प्रकारचा कुठलाही बंद आयोजित करु नये.

- श्री. दीपक काशिराम गुंडये, वरळी

चर्चेतला चेहरा

मेंढपाळाच्या मुलाने लावला लघुग्रहाचा शोध

अमेरिकन अवकाश संशोधन संस्थाने सुरु केलेल्या आंतरराष्ट्रीय लघुग्रह शोध मोहिमेत साताऱ्यातील विनायक दोलताडे यांनी एका लघुग्रहाचा शोध लावून गगन भरारी घेतली आहे. विनायक दोलताडे हे सातारा जिल्ह्यामधील दुष्काळी माण तालुक्यातील माळवाडी गावातील आहेत. त्यांना विद्यार्थी दशेत असतानापासूनच अवकाश निरीक्षणाची आवड होती. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अवकाशातील ग्रह शोध बारकाव्याने निरीक्षण सुरु ठेवले. अमेरिकन अवकाश संशोधन संस्था (नासा) ने सुरु केलेल्या

आंतरराष्ट्रीय लघुग्रह शोध मोहिमेमध्ये विनायक दोलताडे यांना अवकाशातील एका लघुग्रहाचा शोध लावण्यात त्यांना यश मिळविले आहे. नासा, पॅन स्टार्स, कॅटालिना स्काय सर्व्हे आणि हर्डिन सिमन्स युनिव्हर्सिटी टेक्सास यांच्याकडून १ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर दरम्यानच्या कालावधीत घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय लघुग्रह शोध मोहिमेमध्ये 'खगोल भूगोल वेद आणि विज्ञान' या त्यांच्या टीमकडून एका नवीन लघु ग्रहाचा शोध नोंदवण्यात आला. या टीममध्ये विनायक दोलताडे यांच्यासह आनंद कांबळे, संकेत दळवी, वैभव सावंत, मनिष जाधव, गौरव डाहूले यांचा समावेश आहे. या टीमने प्राथमिक अवस्थेत शोधलेल्या या ग्रहाला सध्या KBV0001 असे नाव देण्यात आले असून त्याची नोंद नासाकडे करण्यात आली आहे.

गणेशोत्सवात अडीच लाख भाविकांचा रेल्वेप्रवास

● ७ कोटी ७२ लाख रुपयांचा व्यवसाय ● कोकण रेल्वेने व्यक्त केले समाधान

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

वैश्विक महामारीच्या काळात श्रमिक स्पेशलच्या माध्यमातून महत्त्वाची कामगिरी पार पाडणाऱ्या कोकण रेल्वेमुळे गणेशोत्सव काळात लाखो भाविकांचा प्रवास सुखरूप झाला आहे. अडीच लाख चाळीस हजाराहून अधिक भाविकांनी कोकण रेल्वेने प्रवास केला आहे.

वैश्विक महामारीचे संकट असतानाच गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या आणि परतणाऱ्या भाविकांची संख्या लाखात असते. अशा वेळी त्यांच्या प्रवासाच्या नियोजनाबद्दल अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित झाली असताना कोकण रेल्वेने नियोजन करत मुंबईतून कोकणातील गावागावात आणि

उत्सवाच्या सांगतेनंतर चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुखरूप बनवला यामधून कोकण रेल्वेने ७ कोटी ७२ लाख रुपयांचा व्यवसाय साधला आहे. आपल्या नियमित गाड्यांचे वेळापत्रक बिघडू न देता सलग २० दिवसातील २५० हून अधिक जादा गाड्यांच्या फेऱ्यांचे हे नियोजन कोकण रेल्वेच्या कर्मचारी अधिकाऱ्यांनी २४-२४ तास सलग काम करत यशस्वी केले आहे.

गणेशोत्वासाठी कोकण रेल्वेने टप्याटप्याने नियोजन करत कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी स्पेशल गाड्यांची घोषणा केली होती. पहिल्या टप्यात जाहीर झालेल्या गाड्या तात्काळ आरक्षित होताच चाकरमान्यांना कोकणात येण्यासाठी अधिकच्या स्पेशल गाड्यांची घोषणा करण्यात आली. उत्सवाच्या दोन दिवस आधीपासून उत्सवाच्या सांगतेपर्यंत कोकण रेल्वेने मार्गावर तब्बल २५६ गाड्यांचे नियोजन केले. नियमित मार्गावर धावणाऱ्या गाड्यांचे वेळापत्रक सांभाळत अधिकच्या २५६ फेऱ्यांचे यशस्वी आयोजन सहजसुलभ नव्हते पण हे आवाहन कोकण रेल्वेच्या कामगार अभियंता आणि अधिकाऱ्यांनी आपल्या घरात उत्सव असतानाही अहोरात्र मेहनत करत यशस्वी केले.

महत्त्वाचे म्हणजे, यामध्ये कोठेही गोंधळाची स्थिती निर्माण झाली नाही अगर आरोग्यनिर्बंधाची पायमल्ली झाली नाही. कोकण रेल्वेने गणेशोत्सवापूर्वीच युद्ध पातळीवर काम करत वीर ते रोहा या मार्गावरील दुपदरीकरणाचे काम पूर्ण करून घेतले. याचा फायदा गणेशोत्सवाच्या काळात झाला. जिल्हाप्रशासनाने महिनाभराआधीपासून नियोजन केल्याने आरोग्य तपासणी आणि वाहतूक नियमनाची कामे सोपी झाली. याकरीता कोकण रेल्वेने सहकार्य करणाऱ्या या सर्व यंत्रणांचे आभार मानले आहेत. त्याचप्रमाणे स्वतःच्या यशस्वीतेसंदर्भात समाधान व्यक्त केले आहे.

असलदेत शेतकऱ्यांना ताडपत्री वाटप

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

कणकवली तालुक्यातील असलदेग्रामपंचायतीच्यामाध्यमातून जवळपास ९० शेतकऱ्यांना अर्ध्या रक्कमेत ताडपत्री वाटप करण्यात आली आहे. यावेळी गेल्या मार्च महिन्यात झालेल्या इलेक्ट्रिक टेक्निशियन प्रशिक्षण प्रमाणपत्राचेही वितरण करण्यात आले. १२६० रुपये किंमतीची ताडपत्री ६३० रुपये भरणा करुन शेतकरी वर्गाला उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी जिल्हा परिषद सदस्य संजय देसाई यांनी जिल्हा परिषदेच्या विविध प्रकारच्या योजनेची माहिती देवून अशा योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा असे आवाहन त्यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश मोरजकर, प्रास्ताविक ग्रामसेवक आर.डी. सावंत तर आभारप्रदर्शन सरपंच पंढरी वायंगणकर यांनी केले.



चिपळूणमध्ये बंदला संमिश्र प्रतिसाद

। चिपळूण । वार्ताहर ।

महाविकास आघाडीने लखीमपूर-खेरी येथील हिंसाचाराच्या निषेधार्थ पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला चिपळूण परिसरात संमिश्र प्रतिसाद मिळाला.

वैश्विक महामारीच्या संकटात आर्थिक स्थिती कमकुवत असतानाच मानवाच्या अतिरेकी हव्यासातून घडलेल्या रत्नागिरीतील नैसर्गिक ऱ्हास आणि त्यानुयोगे घडलेली अतिवृष्टी यामुळे उद्भवलेल्या महापुराच्या संकटातला तोंड देताना सर्वच बाजूने चिपळूण कमकुवत झाले आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून आता कुठे परिस्थिती सुरळीत होण्यास सुरूवात झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या आवाहनानंतर चिपळूणकरांनी संमिश्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. चिपळूणमधील बाजारांमध्ये नागरिकांची गर्दी असून काहींनी आपला व्यवसाय, उद्योगधंदे सुरू ठेवले. तर काही व्यापारांनी बंदला प्रतिसाद दिला. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी शहरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शहरातील चिंचनाका येथे शिवसेनेने केंद्र सरकारचा निषेध व्यक्त केला.

नगराध्यक्षांच्या पाठपुराव्यानंतर लस

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

सावंतवाडी नगराचे नगराध्यक्ष संजू परब यांच्या पाठपुराव्यानंतर सावंतवाडी नगरपरिषदेच्या दवाखान्यात अखेर लस उपलब्ध झाली असून शहरवासियांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य सभापती सुधीर आडिवरेकर यांनी केले आहे. शहरवासीयांना लसीकरणासाठी वेगळी सोय व्हावी, यासाठी नगराध्यक्ष संजू परब यांनी पाठपुरावा केला होता.

फोंडाघाट महाविद्यालयात जागतिक मानसिक आरोग्य दिन

मानसिक आरोग्याच्या दृष्टीने प्रबोधन

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट येथे जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याच्या दृष्टीने प्रबोधन करण्यात आले.

याप्रसंगी, सुखी आणि समृद्ध जीवन जगणे हे एकच उद्दिष्ट सर्वांचे असते. भौतिक सुविधांचे खरे मूल्य समजणे म्हणजे सुख. आपल्या जीवनाची सुस्पष्टता असली पाहिजे. आणि ती जर नसेल तर आपण कधीच निरंतर सुखापर्यंत पोहोचू शकणार नाही. असे प्रतिपादन याप्रसंगी प्रमुख व्याख्याते प्रा. विनोद पाटील यांनी केले.

अध्यक्षस्थानावरून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी समुपदेशन कक्षाचे कौतुक केले. आज समाजाला असणारी मनाच्या आरोग्याची गरज ओळखली आहे. गेली दीड वर्षे आपण याच तणावातून जात आहोत. या काळात आलेल्या परिस्थितीत मानसिक आरोग्याची फार गरज आहे. शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्य सांभाळणे हे एक आवाहनच आपल्यासमोर आहे. अस्वस्थता हे सुद्धा एक मानसिक आरोग्याचे लक्षण आहे. शरीराच्या व्यायामाबरोबरच मनाचा व्यायाम सुद्धा गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोकण रेल्वेचा वेग झाला कमी

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

जिल्ह्यातील विविध ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकण रेल्वेचे वेळापत्रक काही काळासाठी कोडमडले. सोमवार, दि.११ ऑक्टोबर रोजीच्या संध्याकाळी झालेल्या जोरदार पावसामुळे कोकण रेल्वे मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली असली तरी रात्रीच्या सर्व गाड्या निर्धारित वेळेत सुरू असल्याची माहिती कोकण रेल्वेच्या सूत्रांनी दिली.

राजापूर परिसरात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे खारेपाटण व राजापूर रेल्वे स्टेशनच्या मधील भागात रेल्वेरुळानजीक दरड कोसळल्याची घटना घडली. दरम्यान, चिपळूण तालुक्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर कामथे आणि सावर्डा दरम्यान रूळांवर पाणी जमल्याने जनशताब्दी एक्सप्रेस थांबविण्यात आली होती. यामुळे गाड्यांचा वेग कमी करण्याचा निर्णय कोकण रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात आला. या दोन्ही भागात संथगतीने वाहतूक सुरू आहे. रेल्वे वाहतूक ठप्प झाली नाही अगर करण्यात आली नसल्याची सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

युवक बेपत्ता

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

सावंतवाडी गवळी तिठा परीसरातील एका केशकर्तनालयात काम करणारा युवक १९ सप्टेंबर पासून बेपत्ता झाला आहे. अनुप राजदेव ठाकूर (२९), असे त्याचे नाव आहे. याबाबतच्या अधिकच्या माहितीनुसार, संबंधित युवक केशकर्तनालयात कामाला होता. तो १९ सप्टेंबरला सायंकाळच्या सुमारास चहा प्यायला जातो असे सांगून दुकानातून बाहेर पडला.

पडवणेवाडी वर नैसर्गिक संकट

। रत्नागिरी । विशेष प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गणपतीपुळे जवळील पडवणेवाडी भीतीच्या सावटाखाली जगत आहे.

पडवणेवाडी परिसरातील तली खाडी ही केसपुरची खाडी म्हणून ओळखली जायची. समुद्राने तिन्ही बाजूने वेढलेला परिसर, परिसरातील खाडी भाग आणि निसर्गाचा आल्हाद असे या वाडी भागाचे स्वरूप होते. मात्र हेच येथील स्थानिकांच्या जीविताला हानीकारक ठरेल, असा अंदाज कुणालाच आला नाही. पण निसर्गाने याची जाणीव दिली आहे.

वरवडे गावातील पडवणे वाडी ही प्राचीन काळापासून समुद्र बेटावर वसलेली आहे. दिवसागणिक हे बेट पावसाळी वादळवारा, पुराचे पाणी आणि समुद्रलाटा यामुळे धूप होवून खचत चालली आहे. त्यामुळे संभाव्य धोक्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. तरी पक्का दगडी सिमेंट बंधारा लवकरच बांधावा, यासंबंधीत प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आल्याची माहिती स्थानिक रहिवासी सुनीलदत्त सरपडवळ यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारात असलेल्या भंडाऱ्यांचे वंशज येथे पिढ्यानपिढ्या समुद्रकिनारी राहत आहेत. मात्र त्यांचे अस्तित्वच धोक्यात आल्याने नाटककार सु. बा. सरपडवळ यांनी बाळगंगा पडवणे श्रमसंघाच्या वतीने ग्रामपंचायतीपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत परिस्थितीदर्शक निवेदने दिली आहेत.

दाऊदच्या बंगल्यात सनातन पाठशाळा

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

खेड तालुक्यातील मुंबके येथील डॉन दाऊद इब्राहीमच्या मालमत्तेची अस्तित्व पुसले गेले असून ॲड. अजय श्रीवास्तव यांनी खरेदी केलेल्या या बंगल्याचे नामकरण चित्रगुप्त भवन, असे करण्यात आले आहे. या वास्तूमध्ये बालकांसाठी सनातन पाठशाळा सुरू करण्यात येणार आहे.

कुविख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याचे मूळ गाव असलेल्या मुंबके येथील दुमजली बंगल्याची

११ लाख ३० हजारांची बोली लावत विकत घेणाऱ्या श्रीवास्तव यांनी येथील तहसील कार्यालयात रजिस्टर प्रक्रिया पूर्ण करून मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

गुन्हेगारी जगतात अधिराज्य गाजवणारा दाऊद मुंबईतील १९९३ साली झालेल्या स्पोटक हल्ल्यानंतर चर्चेत आला. मुंबकेतील दुमजली बंगल्यासह ६ जमिनी, आंबा कलमांची बाग आणि लोटे येथील एक प्लॉट अशी एकूण मालमत्ता शासनाने आपल्या ताब्यात घेतली. या सर्व मालमत्तांचे ॲन्टी स्मगलिंग एजन्सीकडून मूल्यांकनानंतर किंमत ठरविण्यात आली. तर १० नोव्हेंबर २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे या सर्व मालमत्तांचा लिलाव करण्यात आला. यापूर्वी ॲड. वास्तव यांनी केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या अधिकऱ्यांसह मालमत्तेची पाहणी करून शासनाच्या परवानगीने या ठिकाणी स्वयंसेवी संस्था किंवा शाळा उभारण्याचा मानस व्यक्त केला होता.

देश-विदेश

कोळशाअभावी औष्णिक वीजप्रकल्पातील वीजनिर्मिती बंद

कोयना प्रकल्पात अतिरिक्त वीजनिर्मिती

। मुंबई । वृत्तसंस्था ।

देशात कोळशाची कमतरता असल्यामुळे देशातील औष्णिक वीज प्रकल्पातील वीज निर्मिती बंद करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर कोयना प्रकल्पात अतिरिक्त म्हणजे दिवसाला सुमारे पाचशे ते पंधराशे मेगावॉट वीज निर्मिती करण्यात येत आहे. पुढील काही दिवस ही अतिरिक्त वीज निर्मिती सुरू राहणार असल्याची माहिती पोफळी येथील 'महाजनको'च्या अधिकाऱ्यांनी दिली.

कोयना प्रकल्पाच्या चार टप्यांतून एक हजार ९२० मेगावॉट वीज निर्मिती केली जाते. मागणीच्या काळात म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी कोयना प्रकल्पातून वीज निर्मिती केली जाते. मात्र, सध्या राज्यात विजेचा तुटवडा असल्यामुळे प्रकल्पाच्या चारही टप्यातून मागणीनुसार २४ तास वीजनिर्मिती सुरू आहे. वीज निर्मितीसाठी उपलब्ध असलेल्या पाण्याचे नियोजन करून प्रकल्पात अतिरिक्त वीजनिर्मिती करण्यात येत आहे. महाराष्ट्रात खासगी आणि सरकारी कंपन्यांमधून वीज निर्मिती झाल्यानंतर ती कळवा येथील ग्रीडमध्ये आणली जाते. तेथून ती पूर्ण राज्याला मागणीनुसार वीज पुरवली जाते.

ऑक्टोबर हीटमुळे सध्या विजेची मागणी २१ हजार मेगावॅटहून अधिक नोंदली जात असतानाच राज्यातील औष्णिक वीज प्रकल्पांवर कोळसा टंचाईचे संकट ओढवले आहे. महानिर्मितीकडे केवळ दोन-तीन दिवस पुरेल एवढा तुटपुंजा कोळसा

राज्याची विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी कळवा येथील वीज नियंत्रण कक्षातून होणाऱ्या सुचनेनूसार कोयना प्रकल्पात अतिरिक्त वीज निर्मिती केली जात आहे. प्रकल्पाच्या चारही टप्यातून मागणीनुसार वीज निर्मिती करण्याचे नियोजन केले जात आहे.
– संजय चोपडे, मुख्य अभियंता, महाजनको पोफळी

उपलब्ध आहे. त्यामुळे काही तांत्रिक कारणांमुळे एक-दोन दिवस कोळसा वाहतूक ठप्प झाल्यास संबंधित वीज प्रकल्पांमध्ये होणारी वीज निर्मिती ठप्प होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यातही लहरी पावसाळ्यामुळे कोळसा भिजल्यामुळे आवश्यक तेवढा काढता येत नाही. त्यामुळे गेल्या दोन महिन्यापासून महानिर्मितीला कोळशाचा अपुरा पुरवठा आहे. राज्यात कोळशाच्या माध्यमातून वीज निर्मिती करणारे महानिर्मितीचे सात वीज प्रकल्प असून आठ खासगी प्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पांमधून दररोज सुमारे १२ हजार मेगावॅट वीज निर्मिती होत असून उर्वरित वीज इतर प्रकल्पांमधून होते. केंद्रीय वीज प्राधिकरणाच्या नियमानुसार कोळशावरील वीज प्रकल्पांमधून सुरळीतपणे वीज निर्मिती होण्यासाठी त्यांच्याकडे सुमारे २५-३० दिवस पुरेल एवढा कोळशाचा साठा असणे आवश्यक आहे.

'क्यु स्पायडर इन्क्यूबेशन' मध्ये स्वेरीच्या विद्यार्थ्यांची निवड

। पंढरपूर । वार्ताहर ।

'क्यू स्पायडर' या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील तब्बल चोवीस विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे. ही माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

आय.टी. क्षेत्राशी संबंधीत पुणे येथील 'क्यू स्पायडर' या कंपनीच्या निवड समितीने, गोपाळपूर येथील स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचे विशाखा कांबळे, वैष्णवी भादुले, अबोली गायकवाड, प्राची गुरव, सायली आवताडे, सायली मगर, तस्लीम खतीब, मल्हार उराडे, रिचा ताम्हाणे हे नऊ विद्यार्थी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे प्रतिक्षा वागज, जान्हवी शेंबडे, स्वप्नील दर्शनाळे, अभिषेक देशमुख, ऐश्वर्या म्हमाणे, श्रद्धा मिरगणे, अभिलाषा काळे, अमित दणुरे, वैष्णवी मोरे हे नऊ विद्यार्थी आणि मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील पवन परकम, प्रनील नागरस, गौरी गोरे, शुभम बनसोडे, रोहित आदलिंगे, अक्षय टकले हे सहा विद्यार्थी, असे मिळून स्वेरीच्या एकूण २४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

या विद्यार्थ्यांना प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. आशिष जाधव, ट्रेनिंगचे अधिष्ठाता प्रा. अविनाश मोटे व संबंधित प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

म्हाडा रहिवाशांना मुद्रांक शुल्काचा लाभ मिळण्यात अडचण

। मुंबई । वृत्तसंस्था ।

बीडीडी चाळवासियांना ५०० चौरस फुटाच्या घराच्या करारनाम्यासोबत फक्त हजार रुपयेच मुद्रांक शुल्क भरावे लागणार असून असाच लाभ म्हाडा रहिवाशांना मिळण्यात अडचण असल्याचे या घडामोडींशी संबंधित सूत्रांनी सांगितले. पालिकेने त्यांच्या अखत्यारीतील पुनर्विकास प्रकल्पांना हा लाभ दिला असून तो म्हाडा रहिवाशांनाही मिळावा, ही जुनी मागणी आहे. मात्र त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

पुनर्विकास प्रकल्पात रहिवाशांना मोफत मिळणाऱ्या क्षेत्रफळावर बांधकाम दरानुसार मुद्रांक शुल्क भरावे लागते. ही रक्कम काही हजारात असते. ती प्रामुख्याने विकासकाने भरावी, अशी रहिवाशांची अपेक्षा असते. मात्र हे मुद्रांक शुल्क सरसकट हजार रुपये करावे, अशी या विकासकांनी मागणी केली आहे. त्यासाठी पालिकेचा दाखला देण्यात आला आहे.

तत्कालीन म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हैसकर यांनी तसे पत्रही महसूल विभागाच्या प्रधान सचिवांना पाठविले आहे. आता म्हैसकर हेच गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव आहेत. मात्र अद्याप या बाबत निर्णय झालेला नाही. हा स्वतंत्र विषय असून त्याबाबत लवकरच निर्णय होईल, असे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

बसचालकाची आत्महत्या

। बीड । वृत्तसंस्था ।

पगार वेळेवर न झाल्याने चिंताग्रस्त बसचालकाने घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. तुकाराम सानप असे आत्महत्या करणाऱ्या चालकाचे नाव असून ते बीड आगारात कार्यरत होते. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असतानाच गेल्या काही महिन्यांपासून पगार वेळेवर होत नसल्याने आगारातील सर्वच कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत होते. या आर्थिक विवंचनेचा भार सहन न झाल्याने यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती नातेवाईकांनी आणि बस स्थानकातील कर्मचाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, काम करुन सुद्धा कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळत नसतील तर संबंधित मंत्री आणि अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंद करा, अशी मागणी बस कर्मचारी करीत आहेत.

स्वेरीमध्ये एकदिवसीय कार्यशाळा

। पंढरपूर । वार्ताहर ।

येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागामध्ये 'हाऊ टू राईट फंडिंग प्रपोजल' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकात कार्यशाळेचे समन्वयक डॉ.महेश मठपती यांनी ही कार्यशाळा आयोजित करण्याचा नेमका हेतू स्पष्ट केला.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. आशिष जाधव यांनी तर आभारप्रदर्शन इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांनी केले.

ठाणे-बोरिवली भूमिगत मार्गाला गती

। ठाणे । वृत्तसंस्था ।

ठाणे ते बोरिवली अंतर केवळ २० मिनिटांत पार करता यावे, यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून ११.८ किमीचा ठाणे-बोरिवली भूमिगत मार्ग मार्गी लागणार आहे. या प्रकल्पाचा बृहत आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच यासंबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येणार आहे. ठाण्यावरून बोरिवलीला जाण्यासाठी सध्या सव्वा ते दीड तास लागतो. वर्दळीच्या वेळेस दोन तासही लागतात, पण भविष्यात मात्र हे अंतर केवळ २० मिनिटांत ठाणे-बोरिवली भूमिगत मार्गाने पार करता येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा हा प्रकल्प पाच वर्षे रखडला होता. मात्र, हा प्रकल्प आता एमएमआरडीएकडे हस्तांतर करण्यात आला असून प्राधिकरणानेही त्यावर काम सुरू केले आहे. प्रकल्पाचा बृहत आराखडा तयार करण्याचा विचार सुरू असून यासंबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणासमोर ठेवण्यात येईल, अशी माहिती महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी दिली.प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर बृहत आराखडा तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात येईल.

राज्यात लवकरच मेगाभरती

। मुंबई । वृत्तसंस्था ।

राज्यशासनाच्या विविध विभागांकडून सुमारे ५,८०० पदांच्या भरतीकरिता महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मागणीपत्रे अद्यापही प्राप्त होत असून पदांची संख्या आणखी वाढेल, अशी माहिती लोकसेवा आयोगाकडून देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या वतीने जुलैमध्ये शासकीय सेवेतील रिक्त पदे भरण्याची घोषणा करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एमपीएससीकडे संबंधित विभागांनी पदभरतीचे प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना दिल्या होत्या. परंतु शासनस्तरावर त्याबाबत फार काही हालचाली झाल्या नाहीत. खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्याची गंभीर दखल घेत ३० सप्टेंबपर्यंत सर्व विभागांना पदभरतीसंबंधीची मागणीपत्रे एमपीएससीकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर सर्वच विभागांनी धावपळ करून मागणीपत्रे सादर करण्याची कार्यवाही सुरू केली.

विविध विभागाकडून पदभरतीसाठी मागणीपत्र

महाराष्ट्र राज्य सेवा, दुय्यमसेवा अराजपत्रित गट ब, गट क, महाराष्ट्र वनसेवा, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा व महाराष्ट्र कृषीसेवेतील पदांचा तपशील एमपीएससीने जाहीर केला आहे. अनुभव व विशेष अहर्तेवर आधारित सरळसेवेने ही पदे भरली जाणार आहेत. या महिन्यात किंवा पुढील महिन्यात पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्व परीक्षेची तारीख निश्चित केली जाणार आहे, असे राज्य लोकसेवा आयोगातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

उभे भाताचे पीक झाले आडवे

परतीच्या पावसाने शेतकरी झाला हवालदिल

। जेएनपीटी । वार्ताहर ।

आधीच कोरोनामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. त्यात सोमवारी (दि.११) संध्याकाळी उरण तालुक्यात वादळी व विजेच्या कडकडाटासह आलेल्या मुसळधार या परतीच्या पावसाने भात शेतीचे नुकसान केले आहे. एकंदरी अस्मानी संकटामुळे हाती आलेले उभे भाताचे पीक आडवे झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

मागील दोन वर्षांपासून कोरोनाच्या संकटामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा संकटातून स्वतःला सावरुन उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतात भाताचे पीक घेतले, यावर्षी भातशेतीला पोषक असणारा पाऊस पडल्याने भाताचे पीक जोमाने येणार अशी चर्चा शेतकऱ्यांमध्ये वर्तविण्यात येत असताना, सोमवारी संध्याकाळी आलेल्या वादळी व विजेच्या कडकडाटातील परतीच्या पावसाने कापणी योग्य झालेली भाताची उभी रोपे आडवी जमिनीवर पाडली. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी पुरता हतबल झाला असून आता पुढे काय असा प्रश्न स्वतःला विचारत आहे.

परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेल्या भाताचे पीक जमिनीवर आडवे पाडले आहे. त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाने दिलासा देण्यासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या भातपिकांचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना द्यावेत.

– हासुराम मोकल, शेतकरी

बांधपाडा पेयजल योजनेची चौकशी होणार

कोकण विभाग आयुक्तांचे आदेश

। उरण । वार्ताहर ।

तालुक्यातील खोपटे गावातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. त्याबाबत मनसेचे तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत हे गेली अनेक वर्षे पाठपुरावा करीत असूनही अधिकारी वर्ग ठेकेदाराला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. याबाबत सत्यवान भगत यांनी कोकण विभागीय उप आयुक्त नवी मुंबई यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी याची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत.

राष्ट्रीय पेयजल योजनेच्या कामांत ठेकेदारांने घेतलेले काम आजतागायत पूर्णत्वास नेले नाहीत. यासंदर्भात मनसेचे तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत यांनी वारंवार तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याने नाईलाजाने विभागीय आयुक्त कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. याची दखल घेऊन उप आयुक्त कोकण विभाग गिरीश भालेराव यांच्या सहीचे पत्र जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी यांना पत्र पाठवून सदर तक्रार अर्जातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करून त्यात तथ्य आढळल्यास दोषींवर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तक्रारदार भगत यांना देण्याचे आदेश दिले आहेत.

महत्त्वाचे

विजय पाटील यांचे निधन

। अलिबाग । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील विजय दशरथ पाटील यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. निधनसमयी ते ५१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, बहिण असा परिवार आहे. ते दत्तप्रसादिक भजन मंडळाचे उत्तम बुवा, विविध धार्मिक ग्रंथवाचक व गुडलक क्रिकेट संघाचे अष्टपैलू क्रिकेटर होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिवावर परहूरपाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मित्रपरिवारतर्फे तसेच पाटील, म्हात्रे, घरत, नाईक परिवाराकडून तसेच विविध क्षेत्रातील मंडळीकडून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांचे दिवसकार्य २० ऑक्टोबर रोजी तर उत्तरकार्य २२ ऑक्टोबर रोजी होणार आहे.



गावठी हातभट्टी अड्ड्यांवर कारवाई

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाशिवली डोंगराळ भागात गैरकायदा गावठी दारुची हातभट्टी असल्याची माहिती रसायनी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलिसांनी शिताफीने छापा टाकून गैरकायदा गावठी हातभट्टीचा अड्डा उद्ध्वस्त केला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मंगेश वांगी यांनी केली.

याच सभामंडपात बसून सेझ घालवला

मा.आ.धैर्यशील पाटील यांच्या हस्ते दिव सभामंडपाचे भूमीपूजन

। पेण । वार्ताहर ।

नागेश्वर देवस्थान दिवच्या सभामंडपाच्या दुसऱ्या मजल्याच्या कामाचे भूमीपूजन मा.आ.धैर्यशील पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मा.आ.पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, याच नागेश्वर देवस्थानाच्या सभामंडपात पहिल्यांदा सेझच्या विरूद्ध लढा पुकारला आणि वेळोवेळी अनेक बैठकाही याच सभामंडपात घेतल्या. सेझला हद्दपार करण्यामागे याच सभामंडपाचा मोलाचा वाटा आहे, असेच म्हणावे लागेल. त्यावेळी मी आमदारही नव्हतो, तेव्हा बाळाराम पाटलांच्या निधीतून आपण हा सभामंडप बांधला होता. आज पुन्हा या सभामंडपाच्या दुसऱ्या मजल्याचे भूमीपूजन मी करत आहे. या भूमीपूजनाच्या कार्यक्रमासाठी अर्थ व बांधकाम सभापती तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. निलिमा पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे (हरीओम), कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊ एरणकर, माजी सभापती जयप्रकाश ठाकूर, माजी नगराध्यक्ष गुरूनाथ मांजरेकर, लाल ब्रिगेड अध्यक्ष स्वप्नील म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य संदेश ठाकूर, नगरसेवक शोमेर पेणकर, संतोष पाटील, शेकाप ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. परशुराम ठाकूर, दिलीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

शिक्षणातील माझे नवोपक्रम पुस्तकाचे प्रकाशन

। उरण । वार्ताहर ।

शिक्षण क्षेत्रातील विविध अनुभव विद्यार्थी व शिक्षकांसमोर मांडण्यासाठी, विद्यार्थ्यांना, शिक्षकांना एक प्रेरणा मिळावी या दृष्टीकोनातून आदर्श शिक्षक कौशिक ठाकूर यांनी राबविलेल्या उपक्रमावर आधारित असलेल्या शिक्षणातील माझे नवोपक्रम या पुस्तकाचे प्रकाशन आवरे उरण तालुका येथे करण्यात आले.

प्रास्तविकमध्ये शिक्षक कौशिक ठाकूर यांनी पुस्तक प्रकाशनाची संकल्पना, शाळेतील विविध चांगले वाईट अनुभव, विविध राबविलेले उपक्रम याची माहिती दिली. समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी विनायक म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, संस्था चालक अशोक ठाकूर, नवोदित कथाकार महेंद्र पाटील, कुस्तीपटू अमेघा घरत, धाडसी तरुण प्रतीत पाटील, धाडसी तरुण अधिकार पाटील यांचा गुलाब पुष्प, सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक एल बी पाटील, पंचायत समिती सभापती समिधा म्हात्रे, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, मराठी पत्रकार सघांचे अध्यक्ष घनश्याम कडू, मनसेचे नेते संदेश ठाकूर, मनसे उपतालुकाध्यक्ष सत्यवान भगत, कामगार नेते महादेव घरत, पंचायत समिती सदस्य दिपक ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक महेश गावंड यांनी केले.

■ जोगेश्वरी माता नवरात्र उत्सवामध्ये नागोठणे श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था चेअरमन विलास चौलकर आपल्या परिवारासोबत दर्शन घेताना, सोबत पुजारी अनिता गुरव. (जोगेश्वरी मंदिर नागोठणे)

■ तळे शहराची ग्रामदेवता श्री चंडिका देवीचे दर्शन घेताना भाविक. (छायाचित्र : पु.गो.मुळे)

आरोग्य तपासणी

। उरण । वार्ताहर ।

नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ-बोरी, उरण डॉक्टर असोसिएशनचे व लायन्स क्लब ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य तपासणी शिबीर व लाईफ लाईन हॉस्पिटल, पनवेल यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे होणेश्वर मंदिर, बोरी, उरण येथे आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरांच्या आयोजना बद्दल नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ, बोरी यांच्या वतीने अध्यक्ष अतुल ठाकूर यांनी उरण डॉक्टर असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ.प्रीती संतोष गाडे व पदाधिकारी तसेच लायन्स क्लब ऑफ उरणचे अध्यक्ष नरेंद्र ठाकूर व पदाधिकारी व लाईन हॉस्पिटल पनवेलचे आभार मानले.

बालिका दिनानिमित्त रॅलीचे आयोजन

। खांब-रोहे । वार्ताहर ।

भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमातंर्गत आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेसह बेटी बचाओ-बेटी पढाओ रॅलीचे आयोजन करून बालिका दिन उत्साहात संपन्न करण्यात आला.

भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय विधी प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व दिवाणी न्यायाधीश क स्तर रोहा तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती रोहा यांच्या वतीने दि.२ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत सदरील अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अधिकार क्षेत्रातील रोहे तालुक्यातील कोएसो मेहेंदळे हाय.रोहा, द.ग.तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाड, गु.रा.अग्रवाल हायस्कूल नागोठणे व न्यू इंग्लिश स्कूल चणेरा या चार केंद्रावर इ.५ वी ते ७ वी व इ.८ वी ते १० वी या गटातील विद्यार्थ्यांकरिता आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉक्टर दाम्पत्यांचा कोरोना योद्धाने सन्मान

खरोशी । वार्ताहर ।

कोरोना महामारीचे संकट समाजावर आल्यानंतर आपल्या जिवाची परवा न करता शेकडो कोरोना बाधितांचे जीव वाचवणारे सामाजिक बांधिलकी जोपासणारे डॉ.संजय ठाकूर व त्यांच्या पत्नी डॉ.रूपाली ठाकूर यांचा स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

कोरोना काळात दादर पेण येथील डॉ.संजय ठाकूर यांनी आपली सेवा दररोज अहोरात्र सेवा सुरू ठेवली होती. एखादा गरीब जर उपचारासाठी आला त्यांच्याकडुन आपल्या सेवेचे पैसे न घेता उलट त्यास उतार खर्चासाठी पैसे देणे, त्याची आपुलकीने विचारपूस करणे त्याला औषध घेण्यासाठी सुधा पैशाची व्यवस्था करणे अशा पद्धतीने ग्रामीण भागातल्या तरुणांचे देवदूत बनून असल्याने त्यांची वैद्यकीय सेवा आपल्या पत्नी सहित सुरू ठेवली होती. त्यांच्या या कार्याची नोंद साई सेवा मंडळ उर्णोली पेण मधील सदस्यांनी घेऊन नवरात्री उत्सवात भव्य मंदिराच्या प्रांगणात महिला भगिनींच्या हस्ते शंभर दिव्यांनी त्यांचे औक्षण करून डॉ. संजय ठाकूर यांना कोरोना योद्धा सन्मान देऊन तसेच त्यांच्या सौभाग्यवती डॉ.रुपाली संजय ठाकूर यांना कोरोना योद्धा सौभाग्यवती सन्मान देऊन गौरविण्यात आले.

'श्रीसंत नामदेव महाराज यांचे नाव महापुरुषांच्या यादीत समाविष्ट करा'

। तळा । वार्ताहर ।

अखंड हिंदुस्थानात पायी चालत भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करीत समाज प्रबोधन करीत ७५० वर्षापूर्वी ज्यांनी समाजाला उत्तम दिशा देण्याचे काम करणारे श्री संत श्रेष्ठ शिरोमणी नामदेव महाराज यांचे नाव महापुरुषांच्या यादीत समाविष्ट करून संजीवन समाधी दिनी शासकीय सुट्टी शासनाने जाहीर करावे, असे महत्त्वपूर्ण विचार रायगड जिल्हा शिंपी समाज महासंघाचे अध्यक्ष तथा कोकण विभागाचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांनी व्यक्त केले.

रायगड जिल्हा शिंपी समाज महासंघ व श्री देव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज संस्था-तळा आयोजित जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील समाजामधील इयत्ता १०वी व इयत्ता १२ वी मधील प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व श्री संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा दिनी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा व ऑनलाइन वकृत्व स्पर्धा लहान व मोठा गट पारितोषिक वितरण आणि विशेष कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान या सोहळ्यानिमित्त करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय नामदेव समाजउन्नती परिषदेचे विश्वस्त ॲड.ज्ञानेश्वर पाटसकर (पुणे) पुणे शहर शाखा ना.स. परिषदेचे अध्यक्ष संदीप लचके (पुणे), नामदेव हितवर्धक मासिकाचे कार्यकारी सदस्य सुनील पोरे (खारघर) तर तळे नामदेव शिंपी समाजाचे अध्यक्ष महेंद्र कसबजे हे उपस्थित होते.

छावा प्रतिष्ठानतर्फे पूरग्रस्तांचा सन्मान

। महाड । वार्ताहर ।

छावा प्रतिष्ठानतर्फे महाड पोलादपूरमध्ये उद्भवलेल्या पूर्णपरिस्थितीमुळे आलेल्या महासंकटामध्ये माणगाव तालुक्यातील सर्व मंडळांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम युवानेते निलेश थोरे व छावा प्रतिष्ठानच्या सहकार्यांनी हाती घेतला आहे.

माणगांव तालुक्यातील शेकडो युवक मंडळ,ग्रामस्थ तसेच महिला मंडळ, अनेक संघटना व व्यक्तिशः देखील अनेकांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पूर व दरडग्रस्त जनतेला ताजे अन्न, किराणा साहित्य, औषधे, कपडे अशा विविध स्वरूपात मदत दिली. या माणुसकीच्या नात्याने केलेल्या सहकार्याचा सन्मान कुणीतरी नक्कीच केला पाहिजे या भावनेने आम्ही छावा प्रतिष्ठानच्या माध्यमातून माणगाव तालुक्यातील सर्व मंडळाचा यथोचित सत्कार थेट प्रत्येकाच्या गावांत जाऊन शनिवारी व रविवारी अश्या दोन दिवसीय तालुका दौऱ्यात करणार येणार आहे.

कर्जत नगरपरिषद क्षेत्रात लसीकरण

९९ लाभार्थींनी घेतला लाभ

। कर्जत । प्रतिनिधी ।

शासनाने ८ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत कोव्हिड -१९ लसीकरणासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून मिशन कवच कुंडल अभियानांतर्गत कर्जत नगरपरिषदेच्यावतीने लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

येथील श्री कपालेश्वर मंदिरात नगरपरिषद आणि उपजिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी विशेष लसीकरण मोहीम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, नगरसेविका स्वामिनी मांजरे, नगरसेवक विवेक दांडेकर, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी उमेश राऊत, आरोग्य विभागाचे सुदाम म्हसे यांनी भेट दिली.

उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. जयश्री म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली धनश्री मोरे यांनी लसीकरण केले. यावेळी ९९ लाभार्थींनी लस घेतली.

करंजा गावातील रस्त्यांची दुरवस्था

। जेएनपीटी । वार्ताहर ।

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या करंजा गावातील श्री द्रोणागिरी देवीच्या मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे नवरात्रौत्सवा निमित्ताने देवीच्या दर्शनासाठी ये-जा करणाऱ्या भाविकांना खड्ड्यातून मार्गक्रमण करावे लागत आहे.त्यामुळे भाविकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

उरण तालुक्यातील करंजा गाव हे अरबी समुद्राच्या कुशीत वसलेले निसर्ग रम्य गाव आहे. या गावातील टेकडीवर श्री द्रोणागिरी देवीचे जागृत मंदिर आहे. श्री द्रोणागिरी देवीच्या दर्शनासाठी नवरात्रौत्सवात नवी मुंबई, अलिबाग व उरण पंचक्रोशीतून हजारो भाविक मंदिरात ये-जा करत असतात. परंतु येथे रस्त्यांची दयनिय अवस्था झाली आहे. भाविकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे.

॥ पंचक्रोशीतील भाविकांमध्ये नाराजीचा सूर

संजय कणघरे यांना राज्यस्तरीय आदर्श युवक पुरस्कार

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

तामसोली गावचे संजय कणघरे यांना त्यांच्या समाजसेवेबाबत २०२०-२०२१ या वर्षीचा राज्यस्तरीय आदर्श युवक, महाराष्ट्र युथ आयडॉल समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा समारोह ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला होता. राज्यातील अनेक युवकांची या पुरस्कारामध्ये निवड झाली होती. त्यामध्ये तामसोली गावचे सुपुत्र संजय कणघरे यांची निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अनेक स्तरातून अभिनंदन होत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- झिराड येथे दुकानात कामाला लेडीज हवी आहे. ९४२१९५४३४८
- सर्व प्रकारची कपडे व धुलाई व इस्त्री करून मिळेल साडी रोलप्रेस व ड्रायक्लिनिंग करून मिळेल. (अलिबाग मर्यादित)(होम डिल्हीवरी) ९१४६६२१९७७.
- पाहिजे. घर किंवा घरासाठी जागा बेलीमध्येच. एजंट चालतील. ८५३०३०९७६५
- सूपरमार्केट मध्ये Cash Counter वर कामासाठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. संपर्क : ७८७५९९००९२

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

बायोडिझल विक्री करणाऱ्यावर गुन्हा

सात हजार लीटर बायोडिझल जप्त

। जेएनपीटी । वार्ताहर ।

इंधनाचे दिवसेंदिवस भाव वाढत असल्याने अनेक वाहन चालक पर्यायी इंधनाचा वापर करत आहेत. उरणमध्ये देखिल अशा पर्यायी आणि स्वस्त इंधनाची विक्री बेकायदेशिरपणे होत आहे. अशाच प्रकारे बेकायदेशिरपणे बायोडिझलची विक्री करणार्या दोन आरोपी विरोधात उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून सात हजार लिटर बायोडिझल जप्त करण्यात आले आहे. तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली आहे.

प्रकाश देशमुख आणि कल्पेश माने अशी या दोन आरोपींची नावे आहेत. हे दोघे उरण चिर्ले गावातील असून कुणाल यार्डच्या बाजूला सिडकोच्या मोकळ्या जागेत बेकायदेशीरपणे बायोडिझल विक्री करत होते. या बाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांचे जवळ डिझेल विक्रीचा कोणताही परवाना नव्हता त्यामुळे बेकायदेशिर साठवणूक आणि विक्री केल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून ४ लाख ३३ हजार रूपये किंमतीचे ७ हजार लिटर बायोडिझल जप्त करण्यात आले आहे.

तळोजा भागात बिर्याणीचे वाटप

। पनवेल । वार्ताहर ।

तळोजा भागातील स्थानिक भुमिपुत्र सुशिक्षित बेरोजगार संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाटील यांनी मोलमजुरी करणारे गोर-गरीब कातकरी-आदिवासी व मुस्लीम बांधवांना ३०० बिर्याणीचे वाटप करुन आगळ्या वेगळ्या पद्धतीने आपला वाढदिवस साजरा केला. छोटया खेडेगावात जन्मलेले व गरीबीतूनवर आलेले पाटील यांना तरुणपणापासूनच आपल्या गरीब बांधवांसाठी काहीतरी करावे असे वाटत होते. त्यांनी समाजातील गोर गरीबांसाठी वेगेगळ्या माध्यमातून काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी २००३ साली सुशिक्षित बेरोजगारांना काम मिळवून देण्यासाठी स्थानिक भुमिपुत्र सुशिक्षित बेरोजगार संस्थेची स्थापना केली.

समाज मंदिराचे बांधकामाच्या चौकशीची मागणी

। उरण । वार्ताहर ।

उरण नगरपालिकेच्या हद्दीमध्ये सुरू असलेल्या समाज मंदिराचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे समजते. तरी याची चौकशी होऊन ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

१४ व्या वित्तायोगाच्या अनुदानातून नगरपालिकेच्या मालकीच्या बौद्धवाडा उरण येथील सर्व्हे नंबर ६०६ या जागेत समाज विकास केंद्र बांधकाम उभारणीचे काम मेसर्स महादेव एंटरप्राइजेस, उरण यांना देण्यात आले आहे. काम सुरू असताना ठेकेदाराने देखरेख करण्यासाठी स्वतःचे सुपरवायझर, अभियंते यांची नेमणूक करणे आहे. नगरपरिषदेचे सुपरवायझर, अभियंता यांची देखरेख करणे बंधनकारक होते.कामांचा दर्जा मान्यता प्राप्त एजन्सीकडून तपासून घेऊन अहवाल सादर करणे आवश्यक आहे. असे असतानाही या नियमांचे उल्लंघन करून ठेकेदाराकडून बांधकाम सुरू आहे.

ठेकेदाराने स्लॅब टाकण्याचे काम हे रात्री केले होते. याबाबत नगरपालिकेचे इंजिनिअर अधिकारी झुंबर माने यांच्याकडे याची विचारणा ठेकेदाराकडे केली होती. स्लॅबचे काम सुरू असताना त्याठिकाणी कोणतेही अधिकारी वर्ग उपस्थित नसल्याचे दिसून आले. तसेच मटेरियल निकृष्ट दर्जाचे असल्याचे समजते याची चौकशी करून दोषी असल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

नेरळमध्ये महिलांसाठीचे लसीकरणात गर्दीत

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात कवच कुंडल लसीकरण शिबीर आयोजित करण्याची सूचना रायगड जिल्हाधिकारी यांनी केली होती.त्यानुसार कर्जत तालुक्यातील ग्रामीण तब्बल २६ ठिकाणी लसीकरण शिबीरे आयोजित केली गेली.कर्जत आणि माथेरान नगरपरिषद मध्ये तीन लसीकरण शिबिराला देखील महिलांची उत्स्फूर्त गर्दी होती.

कर्जत शहरात उपजिल्हा रुग्णालय आणि नगरपरिषद यांच्या माध्यमातून शहरातील कपालेश्वर मंदिर आणि रॉयल गार्डन सभागृह येथे लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात कोविशील्ड आणि कोव्हक्सीन लसीकरणाचे दोन्ही डोस उपलब्ध होते.या शिबिरांना प्रांत अधिकारी अजित नैराळे,तहसीलदार विक्रम देशमुख, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी,वैद्यकीय अधीक्षक डॉ मनोज बनसोडे यांनी भेटी दिल्या. तर माथेरान गिरीस्थान। नगरपालिका दवाखान्यात माथेरान नगरपरिषद यांच्या माध्यमातून महिलांसाठी लसीकरण शिबिर आयोजित केले होते. त्यावेळी पालिकेचे अध्यक्ष प्रेरणा सावंत,मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी उपस्थिती लावली. नेरळ गावात मंगेश म्हसकर मित्र मंडळाचे वतीने महिलांसाठी लसीकरण शिबिर नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे माध्यमातून आयोजित केले होते. त्यावेळी मंगेश म्हसकर,ग्रामपंचायत सदस्य राजन लोभी,श्रद्धा कराळे,संतोष शिंगाडे,आदीं उपस्थित होते. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ शिंदे, तसेच आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. तेथील ३५० महिलांनी पहिला तर १५० महिलांनी दुसरा डोस घेतला.

माणगावात एक कोरोनाग्रस्त

। माणगाव । वार्ताहर ।

संपूर्ण जगात गेली वर्षभरापासून हैदोस माजविणाऱ्या कोरोना महामारीमुळे सर्वजण जेरीस आले आहेत. या महामारीची दुसरी लाट मार्च महिन्यापासून आली असून रायगड जिल्ह्यात याचा प्रादुर्भाव हळूहळू वाढू लागला आहे. माणगाव तालुक्यात ११ ऑक्टोबर रोजी नवा एक कोरोनाग्रस्त रुग्ण आढळला असून चार रुग्ण स्वतःच्या इच्छाशक्ती व प्रतिकार शक्तीच्या जोरावर पूर्णपणे बरे होऊन घरी गेले आहेत.तर एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे सध्या तालुक्यात आता १३ रुग्ण बाधित असल्याची माहिती जिल्हा माहिती कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

पान १ वरुन

दिवाळी पहाट साजरी करता येणार

सिनेमागृह, मल्टिप्लेक्स, सभागृह ५० टक्के क्षमतेनचं सुरु करता येणार, प्रवेशावेळी आरोग्य सेतू ॲपमधील सुरक्षित स्टेट्स दाखवणं बंधनकारक, सिनेमागृह, मल्टिप्लेक्समधील कर्मचाऱ्यांचे पूर्ण लसीकरण आवश्यक, गर्दी टाळण्यासाठी वेळीची माहिती आधीच देणं बंधनकारक, तिकीट नोंदणी, फूड कोर्टवर ऑनलाईन पेमेंटची सुविधा, तिकीट असणाऱ्यांनाच सिनेमागृहाच्या परिसरात प्रवेश, पार्किंगमध्ये गर्दी होणार नाही याची खबरदारी घ्यावी, मास्क, सॅनिटायझर आणि सोशल डिस्टंसिंग आवश्यक आदी नियमांचे पालन करावे लागणार आहे.

महाराष्ट्रात लोडशेडिंग करणार नाही

उत्पादन संच सुरु करण्यात आल्याने वीजेमध्ये अधिकची भर पडणार आहे, असे राऊत म्हणाले. कोळसा टंचाई असताना देखील भुसावळ येथील २१० मेगावॅट, चंद्रपूर येथील ५०० मेगावॅट, नाशिक येथील २१० मेगवॅट हे संच सध्या बंद आहेत. तसेच नियमित देखभाल दुरुस्तीसाठी तीन संच बंद आहेत. एकूण २७ पैकी सात संच बंद आहेत. कोळसा वाहून नेण्याची कोल इंडियाची क्षमता ४० लाख मेट्रिक टन आहे.

पावसामुळे ती २२ लाख मेट्रिक टन इतकी खाली होती. ती आता २७ लाख मेट्रिक टनापर्यंत आलेली आहे. सोमवारी ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास विशेष म्हणजे शिखर मागणी (पिक डिमांड) काळात महानिर्मितीने औष्णिक, वायू आणि जल विद्युत केंद्रांतून ८ हजार ११९ मेगावॅट इतकी वीज निर्मिती करुन कोळशाच्या कमतरतेच्या काळात सुद्धा राज्याच्या वीज ग्राहकांना पुरेशी वीज उपलब्ध करून देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. महावितरणने सुद्धा त्यांची मुंबई वगळता एकूण विजेची मागणी १८ हजार १२३ मेगावाट आणि मुंबईसह एकूण मागणी २० हजार ८७० मेगावाट सायंकाळी ७ च्या शिखर मागणीच्या सुमारास उद्दिष्टपूर्ती केली आहे, अशी माहिती नितीन राऊत यांनी दिली.

नकाराला झुगारून निर्धाराला प्राधान्य

तेवढं मिळतं. पण, आपण जी नोकरी करतोय ती बिनपगाराची, फक्त मानधनावर असणारी नोकरी आहे. हे माहीत असतानादेखील घरातले पाठवत नसतानासुद्धा बालमृत्यू व मातामृत्यू थांबावेत यासाठी त्यांनी आशा सेविका म्हणून काम करायला सुरूवात केली. कोरोनापूर्वी आशा सेविका या फक्त बालमृत्यू व मातामृत्यू थांबावेत यासाठीच काम करीत होत्या. परंतू, कोरोनाकाळात तर सर्वप्रकारची कामे करायला त्यांनी सुरूवात केली. अँटीजन टेस्ट असो, घरोघरी जाऊन तपासणी असो, लसीकरणाविषयी माहिती देणे व लसीकरणासाठी जाणे ही सर्व धावपळीची कामेदेखील त्या करत आहेत. आशा सेविकांना पगार नसतो पण मानधन असते. परंतु, कोरोनाकाळात केलेल्या अनेक कामांचं त्यांना अजून मानधनही मिळालेलं नाही. तरीसुद्धा कोणतीही तक्रार न करता या कामाची आवड असल्याने त्या या कामामध्ये स्वत:ला पूर्णपणे झोकून देऊन कार्यरत आहेत.

तालुक्यातील घरफोड्या उघडकीस

दुकानामधिल फॅन, ड्रिल मशिन, रंगाचे डब्बे व गल्यातील चिल्लर असा माल चोरून नेला होता. त्याचप्रमाणे पोयनाड, माडवा सांगरी पोलीस ठाण्याचे हद्दीत देखील अशाच प्रकारचे गुन्हे दाखल झाल्याने पोलीसाचे समोर मोठा यक्ष प्रश्न निर्माण झाला होता. पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी याना घरफोडी चोरी मधील आरोपींचा छडा लावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उप विभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शैलेश सणस, सहा.फौज,विनोद जाधव, सहा.फौज अनिल सानप, हवालदार सचिन शेलार, सुजय मगर, नाईक हर्षल पाटील, शिपाई अनिकेत म्हात्रे यांच्या पथकाने प्रयत्न करीत चोरट्यांची माहीती काढुन या गुन्हयाची उकल केली. त्यानुसार २१ ऑगस्ट २०२१ रोजी जेल मधुन जामिनावर सुटलेला आरोपी हर्षल प्रमोद घरत वय २१ रा.शिरवली ता.अलिबाग याने जेल मधुन बाहेर येताच आपले साथीदार साहील संतोष चव्हाण वय २० रा.शिरवली ता.अलिबाग, भावेश संजय म्हात्रे वय २० रा.नारंगी ता.अलिबाग, श्रेयश अजित पाटील वय २१ रा.रांजणखार ता.अलिबाग यांच्या सोबतीने एक टोळी बनवुन रात्रीचे वेळेस पल्सर मोटार सायकलीचा वापर करून अलिबाग शहर, मांडवा पोयनाड व परीसरात घरफोडी चोरी करण्याचे सत्र अवलंबीले होते. एका रात्रीत दोन ते तिन दुकाने फोडुन हाताला लागेल त्या मालाची ते चोरी करून चोरून नेत होते.

त्यांना ०९ ऑक्टोंबर २०२१ रोजी अटक करण्यात आलेली असुन अलिबाग पोलीस ठाण्यातील घरफोडी चोरीचे एकुण ५ गुन्हे उघडकीस आले असुन मांडवा सागरी व पोयनाड पोलीस ठाण्याकडील प्रत्येकी २ गुन्हे उघडकीस येत असल्याची माहिती पोलिस उपविभागीय अधिकारी सोनाली कदम आणि पोलिस निरीक्षक शैलेश सणस यांनी दिली.

अलिबाग पोलीस ठाण्याचे घरफोडी चोरीमधिल एन्टार्क मोटार सायकल, कॅम्प्युटर चोरीस गेलेले कपडे, हार्डवेअर दुकानातील माल, दानपेटया, व चोरी करीता वापरण्यात आलेल्या मोटार सायकल पोलीसानी आरोपींकडून जप्त केल्या आहेत. वरील गुन्हयाचा पुढील तपास अलिबाग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शैलेश सणस हे करत आहेत.

महिलेला ऑनलाईन गंडा ऑनलाईन मद्य खरेदी महागात

ऑर्डर केली असता आरोपीने पैसे मिळाले नसल्याचे भासवत आपल्या खात्यावर वांरवार पैसे वळते करण्यास भाग पाडले. अशा प्रकारे फिर्यादीना तब्बल १ लाख ४४ हजार ०२६ रूपये इतकी रक्कम ऑनलाईन पद्धतीने उकळत फसवणुक केली. याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक पाटील करीत आहेत.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या जमिन मिळकती तिचे मालक श्रीमती गंगी धोंडू सांवरी, रा.शिलारवाडी, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतींचे तपशिलावर वर्णन पुढीलप्रमाणे:-

मौजे-शिलारवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील

स.नं.	हि.नं.	क्षेत्र(हे.आर.)	आकार(रू.पै.)
३०	३	१-३८-००	०-९४
५५	३	१-९७-००	०-९९

वर नमुद मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/१०/२०२१

ॲड.तुषार रामचंद्र भवारे
शॉप नं.२६, शेतकरी भवन
नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९८५०८००८१३

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

Tender / RFX	Description	Estimated cost
Tend-13/ 7000020936	Supply 22KV and 33kV Lightening Arrestors required at various substations under EHV (O&M) Circle Panvel… Refloat thereof.	Rs. 2.23 Lakhs
Tend-15/ 7000020980	Installation, Commissioning and Testing of 80MVAr, 420kV 3-ph Shunt reactor(Bus) for 400kV RS Kharghar, under 400kV RS(O&M) Dn, Kharghar… **Refloat thereof.**	**Rs. 25.27 Lakhs**
Tend-18/ 7000021148	Procurement of battery sets & battery charger with accessories, battery stand and cable at 220kV Mahad S/stn.	Rs. 11.67 Lakhs.
Tend-17/ 7000021144	AMC for transportation, dismantling, erection, of EHV Power transformer, ICT in case of emergency breakdown and transportation of various EHV equipments under Panvel circle.	Rs. 75.00 Lakhs

Tender fee Rs.500/- + GST EMD minimum Rs. 5000/- or 1% for each tender. **Submission of bids from 14.10.2021 to 21.10.2021 up to 11.00 hrs, Bid opening date:-21.10.2021 if possible.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

Contact Person: The Executive Engineer (Adm.) Tel. No. 022-27459625.

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

Sr. No.	Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated cost in lakhs	Submission date
1	e-Tender-08/21-22/ Rfx No.7000019454	E-Tender for hiring of School Van (7 seater i.e. TaTa Maximo/ Magic van or Similar) for School going children from MSETCL Colony at Kansai to Nagothane under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel for the year 2021-22…**2nd call**	Rs. 4,65,933/-	20.10.21 up to 23:59 hrs.

EMD fee Rs. 5000 & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/ Contact Person :** MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : **ee7230@mahatransco.in Note :** All eligible suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER
400kV R.S. (O&M) Dn. Nagothane

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
कार्यकारी अभियंता
भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर, यांचे कार्यालय
भातसा प्रकल्प वसाहत, भातसानगर, ता.शहापूर, जि.ठाणे पिन कोड ४२१६०३
दुरध्वनी क्र.०२५२७-२४९५९४, email id-eebdmdbhatsa@gmail.com
दर मागणी पत्रक सुचना क्र.३ सन २०२१-२२

कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर पीन कोड नं. ४२१६०३ दुरध्वनी क्र.०२५२७-२४९५९४ हे अनुभवी व इच्छुक संस्थेकडुन खालील नमुद परिशिष्ठातील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी दरपत्रक मागवित आहेत. सदर दरपत्रके हे इच्छुक संस्थेने शासनाने संकेतस्थळ https:/mahatenders.gov.in येथून दि.१४/१०/२०२१ पासून दि.२२/१०/२०२१ पर्यंत डाऊनलोड करून ऑनलाईन किंवा हस्ते/रजिस्टर पोस्टाने सादर करावीत. तसेच दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

sr.No.	Particulars of Material	Unit	Rate
1	Geomembrane on upstream face of dam underwater:Supply and fixing of waterproofing system with an impervious liner consisting of two layers of geo-syntheties echanically heat coupled together during extrusion, one being a PVC geo membrane of 3 mm thick and the second one a nonwoven geotextile needle punched polypropylene geotextile having mass per unit area not less than 500 g/m 2 to form a PVC “geo-composite” of width not less than 2 m, laid over an anti-puncture geotextile of minimum 11 mm thick having mass per unit area not less than 200 g/m2. The system to have a drainage layer made of trans missive geonet with drainage conveying conduits. All the geasynthetics elements are to be suitable anchored to the upstream face of the dam by using SS bolts and clamps in the dry condition and geomembrane shall be covered with strips confirming 100% water tightness with Watertight perimeter Seal, including preparatory works like hydro blasting, local chipping, shot-Crete etc. inclusive of cost of all materials, duties and taxes, minimum 10 years warranty, transport operating platform, required tools and plants, hire charges for plant and machineries, supervisory charges, all lead, lift, labor etc., complete (Above Water)	sqm	
2	Geomembrane on upstream face of dam underwater:Supply and fixing of waterproofing system with an impervious liner consisting of two layers of geo-synthetics echanically heat coupled together during extrusion, one being a PVC geo membrane of 3 mm thick and the second one a non-woven geotextile needle punched polypropylene geotextile having mass per unit not less than 500 g/m 2 to form a PVC “ geo-composite” of width not less than 2m, laid over an anti-puncture geotextile of minimum 11 mm thick having mass per unit area less than 2000 g/m2. The system to have a drainage layer made of trans missive geonet with drainage conveying conduits. All the geosynthetics elements are to be suitable anchored to the upstream face of the dam by using SS bolts and clamps in the dry condition and geomembrane shall be covered with strips confirming 100% water tightness with Watertight Perimeter Seal, including preparatory works like hydro blasting, local chipping, shot-Crete etc. inclusive of cost of all materials, duties and taxes, minimum 10 years warranty, transport operating platform, required tools and plants, hire charges for plant and machineries, supervisory charges, all lead, lift, labor etc., complete (Below water upto River Bed)	sqm	

१.दरपत्रक केवळ अंदाजपत्रक बनविण्याच्या उद्देशाने मागविण्यात आलेले आहे. दरपत्रक निविदेची किंवा कामाची हमी देत नाही.
२.कामाबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास ती आपणास कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर, यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येईल.
३.नमुद केलेले दर हे करांसहित असावेत.

जा.क्र.भाधव्यवि/लेशा-४/२९३७/२०२१
दि.११/१०/२०२१

सही/-
कार्यकारी अभियंता,
भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर

भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचे कार्यालय
विमाका/कोवि/२०२१-२०२२/१८०

प्रो जमा रू.....
/ /२०२१

अर्जदाराचे वकील
एन.जी.देशमुख
ने.ता.१२/११/२०२१
दिवाणी चौ.अर्ज नं.३७/२०२१
निशाणी क्र.

रोहा येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात,

१)स्नेहा संजय घाडगे,
वय: ४६ वर्षे, व्यवसाय: गृहिणी,
आधारकार्ड क्र.२०८८ ०२२२ २०५६
२)संस्कृती संजय घाडगे,
वय:१९ वर्षे, व्यवसाय:शिक्षण,
आधारकार्ड क्र.४९५५ ६२१३ ६१६४
दोघीही रा.५-ए/१२, भक्तीसागर सोसायटी,
मु.पो.धाटाव, ता.रोहा, जि.रायगड
अर्जदार

विरूध्द

विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय,
रा.प.रायगड, विभाग पेण,
पत्ता: मु.रामवाडी, ता.पेण, जि.रायगड
सामनेवाले

अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ चे वडील कै.संजय कृष्णा घाडगे हे दि.१२/०५/२०२१ रोजी रहाते घरी ५/अ/१२ भक्तीसागर सोसायटी, मु.पो. धाटाव, ता.रोहा, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ ही मुलगी असे हयात वारस म्हणून असून, त्यांस अन्य कोणीही वारस नाहीत यास्तव वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी या मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांनी मे.न्यायालयात वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचे वारसपत्र वरील अर्जदार यांना देण्यासंबंधी कोणाही इसमांची कोणत्याही प्रकारे हरकती असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आंत या न्यायालयात लेखी कागदपत्रासह सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना वारस दाखला देण्यांत येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय क.स्तर रोहा

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक,
दिवाणी न्यायालय क. स्तर रोहा

कमळ वाणिज्य माळा
खरेदी कर्ज धमाका
व्याजदर द.सा.द.शे.
9.95%
खरेदी किंमतीच्या
90% पर्यंत कर्ज उपलब्ध
कमाल कर्ज मर्यादा रु. 75 लाख

सर्व ठेवीदार, सभासदांना नवरात्रोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा
✓सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नांव
कमळ
रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२
नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अलिबाग
KNS PATSANSTHA
(ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील अग्रेसर पतसंस्था)
मुख्य कार्यालय : कमळ भवन, शिवाजी चौक, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१, दूरध्वनी क्र. ०२१४१-२२६७१६/२२७८६६

माथेरानमध्ये मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कोरोनामुळे माथेरान पूर्णतः बंद होते. पण मागील चार महिन्यांपासून माथेरान हे पर्यटकांसाठी खुले करण्यात आले. माथेरानचे पर्यटन वाढावे यासाठी मुंबई व पुणे येथील रनबडीज या संस्थेने माथेरानमध्ये मॅरेथॉनचे आयोजन करून निसर्ग संवर्धनासाठी पर्यटक एकत्र येऊन धावले.

देशातील विविध भागातील २०० स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला होता. हे सर्व स्पर्धक भारताच्या विविध राज्यातून आले होते. यामध्ये महिला व पुरुष सहभागी झाले होते. १० किमी, २५ किमी, ३५ किमी व ५० किलोमीटर असे चार टप्यात ही स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये १० किमी पुरुष गटात मध्ये

वैभव रामतीर्थे तर ४५ वयोगटावरील स्पर्धेत बिरज जगताप, महिलांमध्ये रिचा पारेख व वरिष्ठ गटातील हेन्रीजेत्ता नायक, २५ किमी पुरुष गटात अनिल कोर्वी वरिष्ठ गटात चार्ल्स टेंज, महिला गटात वर्षा थेटे वरिष्ठ गटात पूजा वर्मा, ३५ किमी गटात प्रदीप पाटील, वरिष्ठ गटात संदेश जाधव, महिला गटात विजयाभारती भट आणि ५० किमी पुरुष गटात सिद्धेश भिडे व वरिष्ठ गटात आशिष पुणतांबेकर हे प्रथम आले.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माथेरान मधील एका हॉटेलमध्ये घेण्यात आला होता. याप्रसंगी संस्थेचे संचालक अरविंद बिचवे यांनी सांगितले की, ही स्पर्धा कोरोना नंतर प्रथमच माथेरानच्या पर्यटन वाढीसाठी व निसर्ग संवर्धनासाठी घेतली. या स्पर्धेमुळे माथेरान मधील माल

|| आशिष पुणतांबेकर प्रथम लेखी आश्वासन
|| रनबडीज संस्थेचा उपक्रम

वाहणाऱ्या कुली पासून रेस्टॉरंट, पॉइंटचे दुकानदार व हॉटेलवाले यांना रोजगार मिळाला. या स्पर्धेत भारतातील विविध राज्यांमधून स्पर्धक आल्याने पर्यटनवाढीसाठी ही स्पर्धा खूप महत्त्वाची ठरणार आहे. या स्पर्धेचे प्रायोजक हृतिक रोशन यांची एचआरएक्स ही होती. या स्पर्धेत २०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. कोव्हिड-१९ चे सर्व नियम पाळून ही स्पर्धा घेण्यात आली. ज्यांनी लसीच्या दोन मात्रा घेतल्या आहेत त्यांनाच या मॅरेथॉनमध्ये प्रवेश देण्यात आला होता.

एका मुलीची, एका पत्नीची तर एका आईची कुणीच न मांडलेली अशी उर्वरित कथा... तिचा कृष्ण सोडून गेल्यावरची कथा. आभाळाकडे आस लावून बघणाऱ्या त्या नंदलालाच्या मायेची, डोळ्यांत प्राण आणून वाट बघणाऱ्या त्या सख्याची, आपल्या नटखट कृष्णाच्या बाळलीलांमध्ये रमलेली ती यशोदा... नि:शब्द झालेल्या आयुष्यात कदाचित शेवटाची वाट बघणारी ती एकटी... नशीब लिहिणाऱ्या त्या विधात्याने पूर्णविराम देऊन अर्धी कहाणी पूर्ण करावी अशी आशा करणारी ती...त्या कहाणीचा अंत कोणाला कधी उमगलाच नसावा... म्हणूनच कदाचित यशोदेची कृष्णानंतरची कथा कुणी लिहिलीच नाही... त्यात काही उरलंच नसावं बाकी... म्हणूनच ती राहिली असावी एकाकी...

छायाचित्रकार सुशील जगताप.

आजचा रंग- निळा

खालापूरमध्ये कवचकुंडल अभियान

। खोपोली । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनातर्फे लसीकरणाची विशेष मोहीम सुरू केली असून नवरात्री निमित्ताने महिलांना कोव्हिड लस देण्यासाठी कवचकुंडल अभियान राबविले आहे. खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात या अभियानाचे उद्घाटन सभापती वृषाली पाटील यांच्या हस्ते करण्यात आले

कोव्हिड महामारीच्या तिसऱ्या लाटेचा धोका पाहता ही लाट येण्या आधीच मोठ्या प्रमाणात लसीकरण झाले पाहिजे, या दृष्टीकोनातून शासनातर्फे विशेष लसीकरण मोहिम राबविली आहे. या मोहिमेत समाजातील लसीकरण करण्यास मागे असलेल्या महिलांसाठी नवरात्री निमित्ताने विशेष कवचकुंडल नावाने विशेष अभियान सुरू केले असून खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात या अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी तहसीलदार आयुब तांबोळी, उपसभापती विश्वनाथ पाटील, मुख्याधिकारी रेश्मा चव्हाण, संतोष जंगम, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रसाद रोकडे, आरोग्य अधिकारी डॉ. निमिष धेंडे, आरोग्य सुपरवायझर शाम गायकवाड यांसह कर्मचारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरचिटणीसपदी मनीष वैती

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

युवा नेते मनीष चंद्रकांत वैती यांची अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या राज्य युवा सरचिटणीसपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल आणि समितीचे युवा अध्यक्ष पुनीत दामोदर तांडेल यांनी वैती यांच्या हाती नियुक्तीपत्र सुपूर्द करून युवा सरचिटणीस पदाचा पदभार सोपवला.

कोळी व मच्छिमार बांधव नैसर्गिक आपत्ती, वादळे व अतिवृष्टीने संकटात सापडले आहेत. मच्छिमार व्यवसाय अडचणीत आला आहे, मच्छिमार बांधवांपुढे अनेक प्रश्न आहेत, त्यांना भेडसावणारे विविधांगी प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर मनीष वैती हे पाठपुरावा व प्रयत्न करतील, असा विश्वास अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी व्यक्त केला.

अभिनव ज्ञान मंदिरात आयटी विषयाचा प्रारंभ

। कर्जत । प्रतिनिधी ।

अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालय कर्जत येथे आयटी विषयाच्या प्रारंभामुळे विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळणार आहे.

कर्जत तालुक्यातील विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कुठेही मागे राहु नये ह्या उदात्त हेतुने आय टी विषयाचा अभ्यासक्रम ह्या वर्षीच्या २०२१-२२ ह्या शैक्षणिक वर्षापासुन अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयाने सुरू केले असून विद्यालयात अद्ययावत अशा संगणक प्रयोगशाळेची निर्मिती

विद्यार्थ्यांना करिअर करण्याची सुवर्ण संधी

करण्यात आली आहे. सदर अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन संस्थेचे पदाधिकारी तथा कार्याध्यक्ष जयंत वैद्य, सचिव जनार्दन मोघे, खजिनदार तथा अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे शालेय समिती अध्यक्ष विनायक चितळे व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.सच्चिदानंद जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र पॉवर लिफ्टींग स्पर्धेमध्ये
संतोष व सुहानी गावडे या पिता पुत्रीचे यश

। अलिबाग । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टींग असोसिएशन व औरंगाबाद द जिल्हा पॉवर लिफ्टींग असोसिएशन यांच्या विद्यमानाने दि.९ ते १० ऑक्टोबर रोजी औरंगाबाद येथे पॉवर लिफ्टींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये संतोष गावडे व सुहानी यांनी सुवर्ण व कास्य पदक मिळविले.

राज्य पॉवर लिप्टींग स्पर्धेमध्ये अलिबाग मधील थळ वायशेत येथील संतोष तुकाराम गावडे यांना सुवर्णपदक व त्यांची मुलगी सुहानी संतोष गावडे यांना कास्यपदक मिळाले आहे. संतोष गावंड हे आरसीएफ थळ या कंपनीमध्ये माथाडी कामगार म्हणून काम करतात तर त्यांची मुलगी बारावीचे शिक्षण घेत आहे. त्यांची निवड गोवा येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

नवरात्रोत्सव २०२१
रंगशक्ती

ऋतूजा घरत, मेकअप बाय- अंकिता (राजेश फोटोग्राफर)

रेखा म्हात्रे

नेने वडेवाले -अलिबाग

मिळुनी साऱ्याजणी - शहाबाज

कृषीवल
www.krushival.in
गणेश दर्शन स्पर्धा निकाल

सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन

हेमंत हनुमंत पवार
संत रोहिदास नगर, माथेरान

ऋषिकेश ठाकूर, भेडखळ

प्रेमनाथ सनू पाटील
मोठे शहापूर-अलिबाग

सागर घाटकर, वाडगाव-अलिबाग

धीरेंद्र ग. पाटील, कुरुळ-अलिबाग

पांडुरंग विष्णू घरत
घरतआळी, लोणारे-थळ

महेश गोपीनाथ मांडवकर, अलिबाग

रुपेश शंकर केंडू, कोळीवाडा-मुरुड

मोहन कृष्णा पाटील
मु. सागाव-अलिबाग

शुभम नाईक-चौल, सागमळा

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बक्षीस वितरण हे सामूहिकरित्या न होता प्रत्येक विजेत्याने ४ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबरपर्यंत दु. १२ ते सायं. ५ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टिप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६२
अटी व शर्ती लागू*

कृषीवल
नवरात्रोत्सव २०२१
रंगशक्ती
नवरात्रोत्सवातील प्रत्येक दिवशीच्या रंगाचे वस्त्र परिधान केलेल्या महिलांचे छायाचित्र कृषीवलमध्ये प्रकाशित करण्यात येईल.
प्रवेश मुल्य ३००/-
गुरुवार, दि. ७ ऑक्टोबरपासून सुरु होणारा नवरात्रोत्सव अर्थात आदिशक्तीचा नवरंगात रंगणारा उत्सव...
बुधवार, दि. १३ निळा
गुरुवार, दि. १४ गुलाबी
शुक्रवार, दि. १५ जांभळा
नवरात्रातील प्रत्येक दिवस हा एका रंगाशी जोडलेला. या माध्यमातून नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित करु या.
आपला फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा raigadkrushival@gmail.com वर पाठवा.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)